# माणूस

५ ऑक्टोबर १९६८ चाळीस पैसे

नवऱ्याच्या छिन्नविच्छिन्न शरीराचे तुकडे तिने गोळा केले त्याचक्षणी तिची मरणाची भीति संपली होती. देवत्वाचा मार्ग तिला सापडला होता. रंजल्यागांजल्यांची सोयरीक तिने पत्करली होती. मरणाच्या भीतीने पळून जाण्याचे तिने नाकारले आणि म्हणूनच झार कुटुंबातली सर्वच्यासर्व माणसे मारली गेली

. . . .

*याची अभिमानाने ‘ मिती गणती ’ करणारा बोल्शेव्हिक क्रांतीचा चाहताही ‘ ग्रँड डचेस ’-च्या कहाणीने काही काळ अंतर्मुख झाल्या-शिवाय राहणार नाही...*

# लेनिन क्रांतितील होरपळ आणि हिरवळ

‘ माणूस ’ दिवाळी अंक

रा. म. शास्त्री (वि. ग. कानिटकर) | यांच्या लेखणीतून उतरलेली एक अविस्मरणीय दीर्घ कथा.

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : एकोणिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** **सप्टें, २०**

'माणूस'मधून क्रमशः प्रसिद्ध होणारी श्री. रा. म. शास्त्री यांची 'युद्धाकडून युद्धाकडे' ही लेखमाला मी अभ्यासुवृत्तीने वाचत आहे. ही लेखमाला पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्यास चांगले होईल. पुस्तकाच्या कव्हरवर २१ सप्ट. च्या अंकात जो मजकूर उद्धृत केला आहे तोच ठेवावा. आपल्या एण लेखामध्ये एक उणीव वाटते, त्यातले नकाशे व्यवस्थित नसतात. अभ्यासाकरता ते पुरेसे व दर्जाचे वाटत नाहीत. या लेखमालेच्या रूपाने राष्ट्रीय विचारसरणीला चालना दिल्याबद्दल लेखकाचे आभार.

**गं. वा. वैद्य**, मुंबई

**स. न.** **सप्टें, २०**

'माणूस'चा नवीन अंक खरेदी केला आणि पहिल्याच मुखपृष्ठावर असलेली तारीख पाहून चकित झालो. २१ सप्टेंबरच्या 'माणूस 'वर २१ ऑक्टोबर असे छापले आहे. कृपया नोंद घ्यावी.

**मनोहर आचार्य, ठाणे**

**२१ सप्टेंबरच्या जागी २१ ऑक्टोबर ही तारीख नजरचुकीने छापली गेली आहे. क्षमस्व.** *—संपादक*

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# ज्ञानबाचं गुऱ्हाळ

## अल्डस हक्सले आणि पुणे महापालिका

एखादी साहित्यकृती अश्लील आहे की नाही हे कुणी ठरवावे ? साहित्यिकांनी, सरकारने का विद्यापीठाच्या संबंधित प्राध्यापकांनी ? मला वाटते, यापैकी कुणीच हे काम करू नये. साहित्यिक लोक महाविक्षिप्त असतात. सरळ सरळ दिसत असूनसुद्धा ते चक्क एखादे पुस्तक अश्लील नाही म्हणून सांगतात आणि आपल्या जातवाल्याचा कैवार घेतात. सरकार हे नेहमीच अनेकवचनी आहे. त्यांचा कुणाशी कुणाचा मेळ नसतो. अश्लील म्हणजे काय याचा कायदेशीर कीस काढीत बसण्यातच ' सरकार ' या प्राण्याला आनंद वाटतो. प्राध्यापकांचे तर विचारूच नका. ते दोन्ही बाजू तितक्याच सफाईने सिद्ध करून दाखवतील.

मग हे समाजकार्य कुणी करायचे ? पुणे महापालिकेने त्याचे उत्तर दिले आहे. ' हे काम आम्ही करू शकतो, ' असे तिने छातीठोकपणे सगळ्यांना सांगितले आहे.

कळला ना संदर्भ ? पुणे विद्यापीठाने बी. ए. च्या परीक्षेसाठी – इंग्रजी विषयासाठी – सुप्रसिद्ध लेखक अल्डस हक्स्ले यांची ' ब्रेव्ह न्यू वर्ल्ड ' ही कादंबरी नेमलेली आहे. ती कादंबरी अश्लील आहे आणि त्यामुळे ती मुलांच्या हाती देऊ नये असे मत पुणे महापालिकेने नुकत्याच भरलेल्या एका सभेत व्यक्त केले. यासाठी मांडण्यात आलेली तहकुबी बहुमताने मंजूर करण्यात आली. या सभेपूर्वी सन्माननीय सभासदांनी हे पुस्तक संपूर्ण वाचले होते की नाही हा प्रश्न येथे गैरलागू आहे. वाचले नसेलही एखाद्या वेळेस. सगळ्यांनी ते वाचले पाहिजे असे थोडेच आहे ! कुणाला तरी वाटते ना की ते अश्लील आहे म्हणून ? मग झाले तर. शंकाकुशंका काढीत बसू नये अशा वेळी. चट्दिशी बंदी घालून विद्यार्थ्यांच्या शीलाचे रक्षण करण्यासाठी धावाधाव करणे हे खरे महत्वाचे. पुणे महापालिकेत त्या दृष्टीने जी विद्वत्तापूर्ण मते प्रकट करण्यात आली आणि जी तहकुबी संमत करण्यात आली तिचे मी स्वागत करतो. बाकीच्या गावातील लोक यापासून धडा घेतील अशी अपेक्षा आहे. असल्या महत्त्वाच्या शैक्षणिक आणि सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत हीच जागरूकता सर्वत्र दिसेल काय ?...

हा विचार करताकरताच माझी तंद्री लागली आणि काही ठिकाणी त्यानुसार

घडलेल्या गोष्टी मला बातमीच्या स्वरूपात दिसू लागल्याही ! ...

## प्रेमगीते काढून टाका
## पोफळापूर नगरपालिकेत तहकुबी

पोफळापूर, दि. ...... काल येथील नगरपालिकेची वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन एका गरमागरम विषयावर अत्यंत खळवळजनक चर्चा झाली. रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा, गावातील अंधार, गटारांची सफाई इ. नेहमीच्या क्षुद्र विषयांवरील कामे बाजूला ठेवण्यात आली. माध्यमिक शाळेत दहावीच्या मुलांना जे मराठीचे पुस्तक आहे त्यात काही प्रेमकविता आहेत आणि त्या मुलांनी वाचणे धोक्याचे आहे, असे गावातील काहीजण सहज बोलले. त्याबरोबर नगरपालिकेत त्यावर तहकुबी आली. तहकुबीची सूचना मांडताना भानगडगल्लीतून निवडून आलेले सन्माननीय सभासद दादोबा अण्णाजी कानफाटे म्हणाले, "या बुकात काही लव्हशीन आहे असं मला समजलेले आहे. असल्या कविता नाय पायजेत. कविता न वाचता, नुस्ता शिनेमा बघून कार्टी बिघडलीत. मग असल्या कविता वाचून तर लई चेकाळत्याल ती. तेव्हा या कविता काढून त्याच्या जागेवर आईच्या कविता वाढवाव्यात अशी माझी सूचना आहे..."

दुसरे सन्माननीय सभासद अप्पाशास्त्री सोमण म्हणाले, "शृंगार हा संस्कृतात शोभतो. कारण त्यातील चावटपणा हा देवादिकांचा असतो. राधा-कृष्णाची रास-क्रीडा, शंकर-पार्वतीचा प्रणय, दुष्यंत-शकुंतलेच्या प्रेमचेष्टा संस्कृतमध्ये वाचताना फार मजा येते. आम्ही तो मिटक्या मारीत वाचलेला आहे. पण मराठीत या भान-गडी आणू नयेत. शाळेतल्या पोरांना तर प्रेमकविता शिकवणे हे महापाप आहे. आताच त्यांना या भानगडी कळू लागल्या तर कॉलेजमध्ये जाईपर्यंत ते गावात हाहाःकार करून टाकतील. मी या कविता वाचलेल्या नाहीत. पण त्या चावट असणार हे उघड आहे. कारण प्रेम म्हणजेच चावटपणा, तो करण्याचा अधिकार तुमचा आमचा आहे. मुलांचा नाही. कारण ते राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत..."

अप्पाशास्त्रींच्या या प्रभावी भाषणाच्या वेळी सभागृहात एकसारखा टाळ्यांचा कडकडाट होत होता. काही सभासदांनी या तहकुबीला विरोध करण्याचा दुष्ट प्रयत्न केलाच. पण सर्वांच्या सावधपणाने तो सिद्धीला गेला नाही. शेवटी ही तहकुबी सूचना बहुमताने मंजूर करण्यात आली आणि या कविता पुस्तकातून फाडून टाक-ण्याची विनंती सरकारच्या शाळाखात्यास करण्यात आली. त्यासाठी निवडक नगर-पित्यांचे एक शिष्टमंडळ पुण्याला नगरपालिकेच्या खर्चाने पाठवण्याचे मंजूर झाले. त्यानंतर नगरपालिकेने तमाशासाठी एक स्वतंत्र थिएटर बांधावे, हाही ठराव बहु-मताने संमत होऊन सभेचे कामकाज संपले..."

५ ऑक्टोबर १९६८

आता आणखी एक वृत्त–

## जोडाक्षराचे धडे गाळून टाका
## बाभळगाव ग्रामपंचायतीचा निषेध


बाभूळगाव, दि. ..." काल बाभूळगाव ग्रामपंचायतीची तातडीची सभा झाली. सभेचा विषय महत्त्वाचा असल्यामुळे जवळजवळ निम्मे सभासद सभेस उपस्थित होते. प्राथमिक शाळेतील मराठी दुसरीच्या मुलांना जे पुस्तक अभ्यासासाठी आहे. त्यातील काही धडे अवघड आणि जोडाक्षरांचे शब्द असलेले आहेत, असे गावात कुणीतरी बोलले. हे वृत्त सर्वत्र समजताच गावात एकच खळबळ उडाली आणि ग्रामपंचायतीत तावडतोब निषेधाचा ठराव मांडण्यात आला. या प्रसंगी सरपंच खंडूकाका बाभुळे म्हणाले, " मला आसं समजल्यालं आहे की, दुसरीच्या बुकात आवघड आवघड जोडाखरं आहेत. मी याचा णिषेध करतो. ल्हान ल्हान, कवळ्या पोरांना आसले धडे वाचा म्हननं धोक्याचं आहे. त्यांची बोबडी वळं ना! आमी राजकारन करतो. आमाला जोडाखराचा उपेग करावा लागतो. काय वेळेस जोड्याचा-सुद्धा उपेग करावा लागतो. ती निराळी गोस्ट आहे. पण मुलांवर अन्याव का? समदी जोडाखरं काढून टाका, आशी माझी सरकारला विनंती आहे..."

दुसरे सन्माननीय पंच देशभक्त बाबूशेट खाबूशेट म्हणाले, " मी कालच हे पुस्तक पयल्यांदा बगितलं. तास दीड तास खर्च करून एक धडा वाचला. त्यात कोंचे शब्द होते ठावूक आहे? **घ्रुस्टदुम्न, फ्रद्युम्ण,** तसेच **धस्टरास्ट्र, अणि रुध्द...** हे शब्द मला इथं तुमच्या म्होरं सांगतानासुद्धा शरम वाटत आहे. केवळ कर्तव्य म्हनूनच मी हे शब्द सांगतो. आसले शब्द मुलांना वाचायला देनं म्हंजे जुलूम आहे. अशानं त्यांच्या मणावर परिनाम होऊन ती शाळेला सरळ टांग मारतील. पुन्हा पुस्तकं हातात धरनार नाहीत. पुस्तकातून आसला आभ्यास सरकारनं घालावा आणि मास्तरांणी तो शिकवावा, ही शरमेची गोष्ट आहे. तरी मी याचा णिषेध करतो आणि ही पंचायत सभा तहकूब करावी–तशी ती णेहमी आसतेच म्हणा, पण पुन्हा एकदा तहकूब करावी–आशी विणंती करतो."

या भाषणानंतर फारशी भाषणे झालीच नाहीत. काही पंचांनी अशा प्रकारचे धडे हे मुलांच्या वयाच्या मानाने शिकवण्यासारखे आहेत, असे सांगण्याचा उगीचच प्रयत्न केला. पण तो सिद्धीस गेला नाही. शेवटी निषेधाचा ठराव करून चहापाना-नंतर पुढील तीन महिन्यांसाठी सभा तहकूब करण्यात आली. असल्या महत्त्वाच्या विषयावर ठराव करून सरकारचे व शाळामास्तरांचे तिकडे लक्ष वेधल्याबद्दल बाभूळगाव ग्रामपंचायतीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

वाचकहो, आणखी काही कल्पनारम्य वार्ता सांगू काय? पण नको. झाले एवढे पुरे नाही का झाले? बी. ए. ची मुले निदान कादंबरी 'अशी' आहे, या समजुतीने तरी ती नक्की संपूर्ण वाचून काढतील, अशी आशा करू या. O

# हा प्रश्न मुळींच "गुंतागुंतीचा" नाहीं..!



"प्रकाशचें माक्याचें तेल" हा त्यावर साधा, सरळ आणि खात्रीचा उपाय आहे. तें नियमित वापरण्यास सुरुवात करा आणि पहा .... हा प्रश्न कधीं उद्भवलाच नाहीं, असें आपणांस वाटेल! केंस गळावयाचें तर थांबतिलच, शिवाय तजेलदार, निरोगी नि लांबसडक केशसंभार आपल्या सौंदर्यांत मोलाची भर घालील.

## प्रकाशचें माक्याचें तेल



प्रकाश ट्रेडिंग कंपनी
गोखले रोड (नॉर्थ) दादर, मुंबई २८



फ्रान्सचा विद्यार्थीच हे करू जाणे

# नवे आंदोलन

आपल्याकडे सप्टेंबर महिना
संप, उपोषणे, निदर्शने आणि दडपशाही
यामुळे गाजला.
पुण्यात विद्यार्थ्यांनी कावळ्याची
एक प्रेतयात्रा काढली.
तशा या अगदी अलग अलग दिसणाऱ्या घटना.
पण काही आंतरिक सुसंगती तर
या वरवरच्या अलगपणाआड दडलेली नसावी ?
या दृष्टीने हा लेख अनेकांना वाचनीय वाटेल.
फ्रेंच पाहुणे पुण्यात आले असता
त्यांच्या मुक्कामाचा फायदा घेऊन
हा तयार करण्यात आलेला आहे.

*लेखक : डॉ. कुमार सप्तर्षी*

बहुतेक घटनांचे परिणाम स्थलकालाच्या मर्यादेत घडत असतात. पण काही घटना अशा असतात की, त्यांच्या परिणामांना स्थलकालाच्या मर्यादा रहात नाहीत. अणुशक्तीचा शोध ही एखाद्या राष्ट्राच्या फायद्याची किंवा दुसऱ्या राष्ट्राच्या तोट्याची घटना, एवढा तिला मर्यादित अर्थ असू शकत नाही. दुसरे उदाहरण, मार्क्सवादाच्या उदयाबद्दल घेता येईल. एक शतकानंतरही मार्क्सच्या विचारांचे हादरे जगाच्या कानाकोपऱ्यात बसत आहेत, बसणार आहेत.

वर्तमानकाळात नुकतीच अशी एक ऐतिहासिक घटना घडली. मे १९६८ मध्ये झालेले विद्यार्थ्यांचे आंदोलन व कामगारांचा संप याने सारा फ्रान्स ढवळून निघाला. पॅरिसमध्ये मे महिन्यात जे घडले, त्याचे परिणाम अतिदूरगामी, सर्वंकष व फ्रान्सपुरते मर्यादित राहणारे नाहीत. आपल्यापर्यंत तेथील घटनांचे खरेखुरे अंतर्बाह्य स्वरूप आले नाही. आपल्या वृत्तपत्रांमध्ये एखाद्या घटनेचे महत्त्व जोखण्याची दृष्टी, कुवत यांचा अभाव असतो की, तशी त्यांची इच्छा नसते हे एक कोडेच आहे. साधनांची कमतरता हे नेहमी पुढे येणारे कारण फारसे बरोबर वाटत नाही. ज्या वृत्तपत्रांजवळ कार्यक्षम यंत्रणा व घडणाऱ्या घटनांचे, मूल्यमापन करण्याची क्षमता आहे, ती वृत्तपत्रे बड्या भांडवलदारांच्या ताब्यात आहेत. त्यामुळे मालकांच्या हितसंबंधांना उपयोगी पडेल अशाच दृष्टिकोनातून वाचकांसमोर सर्व गोष्टी ठेवल्या जातात. त्यांचा वाचकवर्गही विशिष्ट पद्धतीने विचार करणारा असतो. जवळपास घडणाऱ्या घटनांचा खरेखोटेपणा पडताळून पाहणे एखाद्या वेळेस शक्य होते, पण फ्रान्ससारख्या देशातल्या बातम्या बड्यांची वृत्तपत्रे सोडतील तेवढ्याच आणि ते जो रंग फासून देतील त्या रंगात आमच्यापर्यंत पोहोचणार ! पुण्या-मुंबईसारख्या शहरात अँग्लो-अमेरिकन वर्तमानपत्रे वाचावयास मिळतात. एरवी ते 'रिपोर्टिंग' बरे करतात. पण द गॉल विषयी त्यांच्या मनात ओत-प्रोत राग भरलेला असल्याने त्यांचे रिपोर्टिंग पूर्वग्रहदूषित होते. त्यामुळे फ्रान्समधल्या 'मे क्रांति'बद्दल सत्य जाणून घेण्याची उत्कंठा तशीच राहिली होती.

फ्रान्समधल्या घटनांचे औत्सुक्य कायम असतानाच ऑगस्टमध्ये दीडशे फ्रेंच लोक पुण्यात येणार आहेत ही बातमी कळली. त्यांच्याकडून 'चक्षुर्वैसत्यम्' हकीकत कळेल म्हणून बरे वाटले. पुण्यात त्यांचा एक महिनाभर मुक्काम होता. ज्या ए. एफ. एफ. (असोसिएशन ऑफ दि फ्रेन्डस ऑफ फ्रान्स) तर्फे फ्रेंच मंडळी पुण्यात आली होती, त्यांनी 'Events in France, May 1968' अशा शीर्षकाचा परिसंवादही आयोजित केला होता. शिक्षक, विद्यार्थी, मजूर कार्यकर्ता, पत्रकार, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, गॉलिस्ट, अँन्टीगॉलिस्ट असे अनेकजण त्यात बोलणार असल्याने वेगवेगळी आणि भरपूर माहिती मिळेल असे वाटले. त्या परिसंवादास हजर रहावयाचे आणि वैयक्तिक फ्रेंच लोकांशी बोलावयाचे असे ठरविले.

## निराशाजनक परिसंवाद

परिसंवादाने बरीच निराशा केली. कारणे उघड होती. सर्वजण फ्रेंचमधून बोलले. दुभाष्याच्या मदतीने इंग्लिशमध्ये भाषांतर केले जाई, पण एकंदरीत तो किचकट प्रकार होता. अनेक लोक बोलणारे असल्याने प्रत्येकाच्या वाट्यास वेळ थोडा आला. आणखी एक अडचण म्हणजे, त्या मंडळींना—पॅरिसच्या निदर्शनात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या आणि न घेतलेल्या—आंदोलनाच्या सर्व बाजू, सूक्ष्म धागे-दोरे, कळणे शक्य नव्हते. त्यांच्याकडून प्रत्यक्ष पॅरिसमधले प्रसंग तेवढे कळले.

गोहत्त्येविरुद्धच्या दिल्लीमधील आंदोलनात जातीने भाग घेतलेल्या एखाद्या निदर्श-काला त्या आंदोलनाची पार्श्वभूमी, त्यामागे काम करणाऱ्या विविध शक्ति, भारतातील विभिन्न धर्मीयांचे संबंध, राजकारणातील धर्म-भावनेचा प्रभाव, केंद्र मंत्रिमंडळातील नंदांचे स्थान, शंकराचार्यांची वक्तव्ये, गोहत्याबंदी आंदोलनाचे भारताच्या भविष्यातील राजकारणावर परिणाम इ. प्रश्न विचारल्यावर कोणत्या प्रकारची उत्तरे मिळतील ? किंवा इंडियाफौंडेशनतर्फे 'पोरांची देवाण-घेवाण' ह्या योजनेनुसार अमेरिकेत गेलेल्या एखाद्या 'मीना केळकर'ला १९६७ नंतरच्या बिगरकाँग्रेसी सरकारचे भारतीय राजकारणावर काय परिणाम आहेत असा प्रश्न विचारल्यावर ज्याप्रमाणे बाळबोध मते बाहेर पडतील असाच थोडासा प्रकार फ्रेंच पाहुण्यांबद्दल होता. एकेकट्याशी बोलून थोडी अधिक माहिती मिळे. पण भाषेची अडचण असल्याने मन मोकळे करून तास दोन तास फ्रेंच माणसाने खळखळून आपल्याला सर्व सांगितले असे घडणे शक्य नव्हते. तरीही 'अँग्लो अमेरिकन' वृत्तपत्रातून आलेल्या माहितीचा खरेखोटेपणा तपासून पाहणे, त्यातून मनात उद्भवलेल्या शंकांचे निरसन करून घेणे, धर्मगुरू, मजूरपुढारी, राजकारणी, डॉक्टर, विद्यार्थी, ह्यांच्याशी बोलून, फ्रेंच समाजाच्या ह्या विविध घटकांची प्रतिक्रिया प्रातिनिधिक स्वरूपात समजून घेणे, अशा पद्धतीने सत्याच्या जवळपास असलेले चित्र आपण मनात निर्माण करू शकतो. 'युवक क्रांती दळ'च्या कार्यालयावर ८–१० जणांचा गट आला होता. त्यांच्याशी बऱ्याच गप्पा झाल्या पण वैयक्तिक भेटीत जास्त माहिती मिळाली.

ह्या फ्रेंच पाहुण्यांशी मुलाखतवजा बोलायला जायचे म्हणजे ते ज्या बंगल्यात उतरले, त्या यजमानाचा स्वभाव, त्याची राजकारणविषयक मते इ. अडचणी येत. ज्या मुलाखतीत फारशी नवीन माहिती मिळाली नाही; त्यांचा उल्लेख न करता मोजक्याच लोकांशी झालेले बोलणे संक्षिप्त रूपाने सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. अनेकांशी बोलून, माझे म्हणून जे वैयक्तिक मत ( Total Impression ) तयार झाले आहे ते शेवटी देण्याचा प्रयत्न करीन.

दिलीप पाडगावकर ह्या आधी ओळख नसलेल्या पण आता दोस्ती झालेल्या तरुणाकडून बरीच सविस्तर माहिती मिळाली. हा धडाडीचा तरुण दलितांची बाजू घेणारा, कडवा डावा आहे, पण मवाळ कम्युनिस्ट नाही. चार वर्षांपूर्वी फर्ग्युसन कॉलेजमधून बी. ए. झाला. चीनच्या क्रांतीविषयी व क्रांतीनंतरच्या काळात तेथे चाललेले परिवर्तन अभ्यासावे ही मनापासून इच्छा ! खटपटीलटपटी करून फ्रान्स-मध्ये गेला. स्वतःच्या पायावर उभे राहून, सध्या ज्या विद्यापीठाचे नाव दुमदुमत आहे त्या पॅरिसमधल्या सॉरबॉन विद्यापीठात पॉलिटिक्समध्ये पीएच्. डी. झाला. आता चार वर्षांनंतर प्रथमच भारतात पाऊल ठेवले. 'टाईम्स ऑफ इंडिया'चा प्रतिनिधी म्हणून पॅरिसमध्ये नेमणूक झाल्याने लगेच परत जाण्याची तयारी ! मे

महिन्यात स्वतः सॉरबॉनमध्ये पोलिस–विद्यार्थी चकमकीच्या वेळी हजर होता. तेथे स्थापन झालेल्या ' क्रिटिकल युनिर्व्हसिटी 'त प्रत्यक्ष भाग घेतला होता. त्याच्याकडून अनेक गोष्टी कळल्या. सारांश असा, " कन्झ्युमर सोसायटीच्या विरुद्ध विद्यार्थ्यांचे बंड होते. विद्यार्थी पुढे आणि विचारवंत, विरोधी पक्ष, कामगार, नेतेमंडळी त्यांच्यामागून फरफटत जात होती. १९३४ साली लिहिलेल्या पॉलिटिक्सच्या नोटस् राजकारणाचे सर्व संदर्भ बदलले तरी अजून शिकविल्या जातात. युरोपातली नवी पिढी, भांडवलशाही समाजव्यवस्थेबद्दल तीव्र चीड बाळगते. 'मे क्रांती'ही निराळ्या प्रकारची सांस्कृतिक क्रांती आहे. सॉरबॉनमधील क्लासरूमच्या खिडक्या उघडल्या की, ' गलिच्छ वस्त्यांचे ' (Slum areas) दर्शन घडते, त्यांच्याबद्दल हे विद्यार्थी आस्था बाळगतात. आपल्या समाजव्यवस्थेत कोणी शोषिला जाऊ नये असे ते मानतात. सध्या फ्रान्समध्ये वर वर शांतता दिसत असली आणि क्रांती मृतवत झाल्याचे भासत असले तरी ते खरे नाही. पुनरावृत्तीची दाट शक्यता आहे. "

## हिप्पीज आणि विद्यार्थी

' युक्रांद 'च्या कार्यालयावर फेंडलूर पतीपत्नींची भेट झाली. पती डॉक्टर व पत्नी शिक्षिका. मी त्यांना प्रश्न विचारला की, " तुमच्या मते प्रचलित भांडवलशाही, यंत्रशाही (Capitalist & Technological) समाजव्यवस्थेवर विद्यार्थ्यांचा राग आहे. हिप्पीजच्या मनातही समाजरचनेविषयी घृणा आहे. मग हिप्पीज व आंदोलन करणारे सध्याचे विद्यार्थी सारखेच की काय ?" ह्या प्रश्नावर थोडेसे थांबून त्यांनी उत्तर दिले की, "हिप्पीज व ह्या विद्यार्थ्यांत मूलभूत फरक आहे. माणुसकीला पारखी झालेली, प्रेमाचा अभाव असलेली प्रचलित समाजव्यवस्था हिप्पीजना घृणास्पद वाटते. आपण त्यापासून चार हात दूर असावे, असे त्यांना वाटते. हा भांडवलशाही समाज माणसाला गिळून टाकण्यात फारच तरबेज असल्याने ह्या समाजव्यवस्थेचे घटक बनून आपला बळी जाण्याचा संभव आहे, अशी त्यांची धारणा आहे. म्हणून ते लांब केस वाढवितात, रोज स्नान अनावश्यक मानतात, घर करून रहात नाहीत, कोठल्याही प्रकारचा व्यवसाय करीत नाहीत, गाणी म्हणतात, भीक मागतात, फुटपाथवर झोपतात व आपल्या धुनमध्ये मस्त असतात. त्यांचा सर्व राग निष्क्रिय (Passive) आहे. याउलट आताचे विद्यार्थी प्रचलित व्यवस्थेविरुद्ध असंतोषाने धुमसत असून त्यांचा राग क्रियाशील (Action–Oriented) आहे. सध्याची भांडवलशाही समाजव्यवस्था तोडून मोडून नष्ट करून, आणि मानवी मूल्यांवर आधारलेला समाज उभा करू अशी त्यांची जिद्द आहे. ते हिप्पीजप्रमाणे समाजयंत्राच्या भयानक स्वरूपाला घाबरून माघार घ्यावयास तयार नाहीत. त्यासाठी हातात मशाल घेऊन " मारू किंवा मरू " ह्या निश्चयाने ते बाहेर पडले आहेत.

लीलॉ युनिर्व्हसिटीत तत्त्वज्ञान विषय शिकणाऱ्या मोरेलने, त्याच्या युनिर्व्हसिटी-

मधल्या प्रत्येक निदर्शनात भाग घेतला होता. असंतोषाची कारणे विचारल्यावर तो म्हणाला, " विद्यार्थ्यांच्या असंतोषाचा विचार करताना दोन तीन बाजूंचा विचार करावा लागेल. राज्यशासनाचे शिक्षणविषयक धोरण व सामाजिक परिस्थिती ह्याविरुद्ध तरुणांचा राग होताच. पण, विद्यापीठाच्या कार्यपद्धतीमुळे त्यांना दैनंदिन बाबतीतदेखील जाच होत असे. विद्यार्थीसंख्या अलीकडच्या काळात चौपट झाली, तरी वर्गाचे आकार व संख्या तेवढीच आहे. एकेका वर्गात पंधराशे सतराशे विद्यार्थी असतात. वर्गात जागा मिळण्यासाठी क्यूमध्ये उभे रहावे लागते. मुले कॅफेमधून अभ्यास करतात. शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांचा मानसिक संपर्क येतच नाही. अशा परिस्थितीत शंका विचारणे इत्यादी गोष्टी अशक्य आहेत. जुन्या पुराण्या नोट्स वरून यांत्रिकी पद्धतीने शिकवून विद्यापीठाच्या कारखान्यातून पदवीधरांचा माल तयार केला जातो. त्या कारखान्यात पदवीचा शिक्का मारून घेतला तरी पुढे नोकरीची हमी नसल्याने तो आपल्या भविष्याच्या सुरक्षिततेविषयी सदैव साशंक असतो. सोशॉलॉजी हा विषय घेऊन दर वर्षी पाच हजार पदवीधर बाहेर पडतात. पण ह्या विषयाला टेक्नॉलॉजीच्या समाजव्यवस्थेत स्थान नसल्याने नोकरी मिळत नाही. शोषणाच्या व्यवस्थेत ज्याचा उपयोग नसतो, त्याला भांडवलशाही समाजात क्षुद्र समजले जाते. माणूस मोठ्या यंत्रातला एक निर्जीव लहान भाग म्हणून रहाण्यास तयार नसेल तर तो समाजातून फेकला जातो. फ्रान्सच्या पाच कोटी लोकसंख्येपैकी बेकारांची संख्या पाच लाख आहे. ह्या व्यापक सामाजिक बाजू सोडल्या तरी काही सुधारणा विद्यापीठातून लगोलग करता येण्यासारख्या असूनही केल्या जात नव्हत्या. विद्यार्थ्यांशी वागण्याची पद्धतही सहृदय नसायची. सुधारणेची मागणी फार वाढली तर वर्गातल्या बाकांची हलवाहलव करण्यात येऊन त्यांची पुनर्रचना होई. बाकांची पुनर्रचना म्हणजे विद्यापीठांची नवीन तत्त्वांवर पुनर्रचना नव्हे! अशी धूळफेक सतत चालू होती म्हणून आता अचानक स्फोट झालेला दिसत असला तरी त्याची पाळेमुळे खूप खोल आहेत. तात्कालिक निमित्त म्हणून सोशॉलॉजीच्या विद्यार्थ्यांच्या गटाचे कारण झाले. सोशॉलॉजीच्या विद्यार्थ्यांना साहजिकच समाजदोषाचे ज्ञान अधिक असते."

पीअर नावाच्या अर्थशास्त्राच्या तज्ज्ञ माणसाने असंतोषाची अर्थ-


सोने-चांदीच्या
तसेच
खड्यां मोत्यांच्या कलात्मक
दागिन्यासाठी.
व्ही. एस. भाटकर आणि कं. ज्युवेलर्स
एन. सी. केळकर रोड दादर, मुंबई-२८

शास्त्रीय दृष्टिकोनातून मीमांसा केली. "शेतीचे यांत्रिकीकरण झाल्याने तेथे श्रमाची कामे कमी झाली आणि त्यामुळे खेड्यातली २५ टक्के लोकसंख्या शहराकडे गेली. त्यात आणखी १९६७ सालात मंदीची लाट येऊन अनेक कारखाने बंद करण्यात आले. त्यामुळे शहरातून बेकारांची संख्या खूप वाढली. बेकारी हे असंतोषाच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे."

## तरुण विद्यार्थी, तरुण कामगार

तरुण कामगार नेता कलोद लिखमान, विमानाच्या कारखान्यात काम करतो. परवा झालेल्या निवडणुकीत तो उभा होता. त्याला इंग्लिश अजिबात येत नव्हते. लेबर लीडरला साजेसा आरडाओरडा करीत तो बोलायचा. तो स्वतः सोशॅलिस्ट असून CFDT चा [ Confederation Francaise Demoeraticque Du Travail ] सदस्य आहे. त्या संघटनेचे दहा लाख सदस्य आहेत. द गॉलविषयी त्यांची तीव्र नापसंती होती. वाक्यावाक्यागणिक तो भांडवलशाहीला व तिला मदत करणाऱ्या द गॉलला दूषणे देत होता. त्याने कम्युनिस्टांना व सर्व जुन्या कामगार नेत्यांना शिव्या मोजल्या. फ्रान्समधले एवढे जोशपूर्ण आंदोलन, "विद्यार्थी व तरुण कामगार" त्यांच्या युतीनेच घडू शकले. हे सारे कसे घडले हे सांगताना त्या आठवणींनी त्याच्या डोळ्यात एक चमक तरळून गेली. "दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रान्सच्या राजकारणाला वेगळे वळण लागले आहे. सर्व कामगार वर्गाचा पाठिंबा मिळू शकेल अशी प्रतिमा डावे पक्ष उभी करू शकले नाहीत. 'कन्झ्युमर सोसायटीच्या' विरुद्ध हा उद्रेक आहे. तरुण विद्यार्थी व तरुण कामगार ह्यांनी हातात हात घालून निदर्शने केली. दोघांचे दुःख एकच असले तरी, त्यांची एकी झाली ह्याचे खरे कारण पोलिसांचे पाशवी अत्याचार हेच होत. विद्यार्थी व तरुण कामगारांची ही फळी मोडण्याचे प्रयत्न करून कम्युनिस्ट नेत्यांनी कामगारांना अलग काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण कामगारांनी नेत्यांचे आदेश न पाळता विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला. कम्युनिस्टांनी क्रांतीशी प्रतारणा केली असे सर्वसाधारण मत आहे. विद्यार्थ्यांनी सॉर्बॉन युनिव्हर्सिटी ताब्यात घेतली तर कामगारांनी कारखाने ताब्यात घेतले. संप असल्याने रोजच्या कामाच्या वेळात विविध विषयावर फॅक्टरीत चर्चा व्हायच्या. मनमोकळेपणे एकमेकांशी चर्चा करणे हा आमचा आयुष्यातला पहिलाच आगळा आनंद होता. मालक, मॅनेजर व इतर मॅनेजमेंटला आम्ही कुलूप लावून कोंडून ठेवले होते. परंतु खिडकीतून त्यांना ब्रेकफास्ट, जेवण, चहा इ. सर्व गोष्टी पुरविल्या जात. त्यांना आम्ही फार सभ्यपणे वागविले. कारण आमचा वैयक्तिक राग नसून भांडवलशाही पद्धतीवर (system) राग होता. फ्रान्समध्ये कामगारांचा बेसिक पगार फारच कमी आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जी राज्यपद्धती किंवा जे शासन कामगारांची जबाबदारी स्वीकारीत नाही तिच्या विरुद्ध पवित्रा घेऊन कामगारवर्ग उभा राहिला आहे."

ॲलन गॅळर हा पॅरिसमधला विद्यार्थी ओठावर मिसरुड फुटण्याच्या बेतात असलेला विशीतला तरुण! त्याने निदर्शनात पुढाकार घेतला होता. तो जहाल डाव्या मताचा असून बहुसंख्य विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी मानावयास हरकत नाही. सेमिनार मध्ये तो बोलला होता. "अफ्ल्यूअंट सोसायटी माणसाला 'माणूस' म्हणून वागवायला तयार नाही, त्याला निर्जीव यंत्राचे स्वरूप द्यायचे आहे, ह्या प्रयत्नांविरुद्ध आमची क्रांती आहे. माणसाच्या मूळावरच आघात करणारे आव्हान आम्ही स्वीकारले आहे." स. प. कॉलेजमधल्या सेमिनारमध्ये, नानासाहेब गोरे यांनी, "ह्या मुलांच्याजवळ विधायक कार्यक्रम नाही. ही क्रांती नसून पोरखेळ होता. चळवळ्या लोकांचा हा उद्योग असून फ्रान्सच्या इतिहासाला साजेसाच हा प्रकार होता. ह्या मुलांच्या घोषणांचा मला अर्थच कळत नाही" असे आपले मत जोराने मांडून, "सर्वांच्या अंतःकरणांतील हे दुखणे होते आणि ते सोडविण्यात, तुम्हा तरुणांनी पुढाकार घेतला होता तर तुमचा पराभव होऊन द गॉल निवडून कसा आला?" असा यक्षप्रश्न फ्रेंच तरुणांच्यापुढे मांडला होता. त्यावरून ॲलन गॅलर फार चिडला. मला तो म्हणाला, "तुम्हा भारतीयांना आमचे प्रश्न कळणे शक्य नाही. तुमच्या आमच्या परिस्थितीत, व जीवनाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात फरक आहे, त्यामुळे तुम्हाला समजावून सांगणे कठीण आहे. पॅरिस आणि फ्रान्स यामध्ये बरीच शैक्षणिक विषमता आहे. त्यामुळे द गॉलला फ्रान्समधल्या खेडूत जनतेची मते मिळाली. म्हणे द गॉल कसा निवडून आला!! ही क्रांती नसून पोरकटपणा होता! मी ठामपणे सांगेन की, ही क्रांतीच आहे. पण क्रांतीच्या साचेबंद कल्पनेतली ही क्रांती नव्हे. ह्या क्रांतीचे स्वरूप मानसिक आणि सांस्कृतिक आहे. ती आज नाहीतर उद्या, दहा वर्षांनी, पन्नास वर्षांनी यशस्वी होईलच असा मला विश्वास आहे. तुमच्याकडे कॉंग्रेस सरकारला बहुमत कसे मिळते? ते निवडून येतात, म्हणजे सर्व विचारवंताना ते राज्य पटले आहे असा अर्थ होत नाही ना? सामान्य भारतीयाप्रमाणेच सामान्य फ्रेंच मनुष्यदेखील एवढा खोल विचार करू शकत नाही. दहा वर्षांत द गॉलने फ्रान्सच्या नावाभोवती जे वलय निर्माण केले त्यामुळे त्यांच्या दृष्टीवर पटल आले. भरभराटीच्या नावाखाली मानवी मूल्ये कशी तुडवली जात आहेत हे त्याला कळू शकत नाही. फ्रान्सच्या खेडुत जनतेला 'शहरातले लोक' दंगे करतात असे सांगून द गॉलने घाबरवून सोडले. वाहने, रेडियो, टेलिव्हीजन प्रचाराची इतर सर्व साधने गॉलिस्ट लोकांच्या हातात होती. आम्ही विद्यार्थ्यांनी निवडणुकात प्रत्यक्ष भाग घेतला नव्हता. फ्रेंच जनतेपुढे पर्यायी पक्ष म्हणून निवड करण्यास दुसरा पक्ष नव्हता तरी पूर्वीचा फ्रान्स आता परत कधीही दिसणार नाही. त्या अर्थाने द गॉल ही व्यक्ती विजयी झाली तरी 'गॉलिझम्' चा पराभव झाला आहे. जुन्या पिढीकडून ज्या पद्धतीचे जीवन तरुण पिढीच्या हातात येते त्याच्याविरुद्ध सर्व तरुण लोकांचा रोष आहे. मी पुनःपुनः सांगेन की, यशस्वी वा अयशस्वी पण ही क्रांतीच आहे."

## प्रातिनिधीक मत

आमच्या जवळच उभ्या असलेल्या दोन स्त्रिया आमचे संभाषण लक्ष देऊन ऐकत होत्या. लहान मुलांच्या रोगांचा डिप्लोमा नुकताच पास झालेली कु. मारी फ्रान्स्-वाज् फोलिओ व लॅबोरेटरीत काम करणारी कु. ओदिल प्लीव्हार अशा ह्या दोघींना आम्ही आमच्या संभाषणात सहभागी केले. मी त्यांना म्हणालो, "Whether you will call it a May Revolution or a May crisis ?"

"Of course May Revolution !" ("अर्थात, आम्ही त्याला क्रांतीच म्हणू", असे दोघीही ठासून म्हणाल्या.

पण जरावेळापूर्वीचा ॲलनचा संतापलेला चेहरा आठवून त्याच्याकडे दृष्टिक्षेप टाकीत फोलिओ मिस्किलपणे म्हणाली, "I call it may Revolution with smile on my face, not with serious face ! Revolution in the sense of mental revolution. I don't approve fights in the streets. People of age of sixteen enjoy fights because of their age; I think what happend in France was good and useful because for ten years France was sleeping !"

तिचे हे मत फ्रान्समधल्या उच्च मध्यमवर्गीयाचे प्रातिनिधिक मत म्हणता येईल. ओदिलला मिस्किलपणे डोळे उडवीत उत्तरे देण्याची सवयच होती. मोडके तोडके इंग्लिश येत असल्याने दुभाष्याची आवश्यकता नव्हती. तिने व्यक्त केलेली एक दोन मुक्ताफळे फार मार्मिक होती. "ब्रिटिश आणि आम्ही एकमेकांना कितीही शिव्या देत असलो तरी आमच्यात समान गोष्टी बऱ्याच आहेत. त्यांना डोक्यावर एक राणी लागते तर आम्हाला द गॉल लागतो !" "अमेरिकेच्या बाबतीतही तसेच. ते मार्टिन ल्यूथर किंगला मारतात. आम्ही बेनबार्काला मारतो." "द गॉलचे फ्रान्सवर प्रेम आहे. पण फ्रेंच लोकांवर राग आहे."

कु. मॅरीव्हान गेल्यावर्षीदेखील पुण्यात आलेली होती. तिला महाराष्ट्राची खूप माहिती असून ती महाराष्ट्रीय पेहराव इतका व्यवस्थित करते की, ती फ्रेंच आहे हे मुद्दाम सांगितल्याशिवाय लक्षात येत नाही. ती पॅरीसपासून जवळच्या शहरात शिक्षिका आहे. तिला राजकारणाची समज सखोल असून तिने प्रत्यक्ष स्वतः पॅरीस-मधील निदर्शनांचे संघटन, संयोजन केले होते. धोरण ठरविण्यातही तिचा पुढाकार असे. विद्यार्थी नेता डॅनियल कोहन बेंडिटला ती स्वतः चांगली ओळखते. तिच्या बोलण्याचा सारांश पुढीलप्रमाणे होता —

"शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते अगदी दूरचे असते. इतिहासात प्रथमच शिक्षक आणि विद्यार्थी परवाच्या मे महिन्यात मनमोकळेपणे बोलले. चर्चा कर-ण्याची अशी संधी आंदोलनाच्यापूर्वी कधीच मिळाली नसती. शिक्षक वर्गाचा 'मँडेरीन्स्' सारखा (चीनमधले उच्च पदस्थ) एक अलग वर्गच निर्माण केला

जातो. शिकविण्याची नवीन पद्धत शोधावयास हवी. Knowledge must not be tauhgt but it should be transmitted. शिक्षकाने मुलांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास नैसर्गिक रीत्या होऊ देण्यास मदत केली पाहिजे. काहीतरी अमूर्त ज्ञान देण्याऐवजी जीवनाचा अर्थ समजावून सांगणारे, व्यक्तिमत्त्व विकसित करणारे ज्ञान दिले पाहिजे. शिकविणे म्हणजे लादणे नव्हे. ज्ञान हे शिक्षक व विद्यार्थी ह्यांच्या जिव्हाळ्याच्या संबंधांतून व दोघात चर्चा होऊन सहजगत्या मिळाले पाहिजे. केवळ व्यक्तिगत जीवनाचा विचार करायला शिकविणे चूक आहे. सध्याच्या शिक्षणातून सामाजिक दृष्टी दिली जात नाही. ज्ञानाच्या वाढीसाठी ज्येष्ठ–कनिष्ठ भाव आड न येता 'खुली चर्चा' होण्याची आवश्यकता आहे. फ्रान्समध्ये नेमके उलटे चालले आहे. शिक्षण क्षेत्रात संघर्ष कसा चालला होता हे द गॉलच्या दहा वर्षांच्या राजवटीत बारा शिक्षण मंत्री बदलले यावरूनच लक्षात येईल. बऱ्याच काळ धुमसणाऱ्या दुखण्याचा मे महिन्यात स्फोट झाला एवढेच !"




आपल्याकडे धार्मिक दृष्टी व धार्मिक शक्ती ह्या प्रतिगामी स्वरूपाच्या असून पुरोगामी विचारांना अडसर घालण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे पॅरीसच्या परवाच्या घटनांमध्ये तेथल्या कॅथालिकांनी कोणती भूमिका घेतली याविषयी मला औत्सुक्य होते. कारण ही नवी पीढी पूर्णपणे अश्रद्ध आहे. ती धर्मावर, शिक्षकांवर, नेत्यांवर, पक्षांवर, ग्रंथांवर, कशावरच अंधपणे श्रद्धा ठेवावयास तयार नाही. त्यांची श्रद्धा फक्त विमुक्त विचारावर आहे. मनातले विचार खरेपणाने कोणाला न जुमानता मांडावयाचे आहेत. माझा समज असा की, माणसाकडून श्रद्धेची अपेक्षा करणाऱ्या, विचारस्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या ह्या धर्मशक्तीचा तरुणांना विरोध असेल. पण अगदी आश्चर्य वाटण्यासारखी माहिती मिळाली. काही धर्मगुरू व बऱ्याच कॅथॉलिकांशी बोलणे होऊन असे कळले की, कॅथॉलिक्स परवाच्या क्रांतीमध्ये अग्रभागी होते. याचे कारण, मूलतः ख्रिश्चन धर्मात दुसऱ्या मानवाविषयी कणव वाटणे यावर फार जोर आहे. विद्यार्थ्यांचे बंड, मानवाविषयी वाटणाऱ्या कळवळयातूनच निर्माण झालेले असल्याने, कॅथॉलिकांना ते बंड अधःपतित ख्रिश्चनाला खरा ख्रिश्चन बनविण्यासाठीच आहे असे आतून वाटले.

## पोलिसांचे अत्याचार

समाजातल्या शिक्षकापासून टॅक्सीड्रायव्हरपर्यंत सर्वच घटकांचा विद्यार्थ्यांना पाठिंबा मिळाला याचे रहस्य पोलिसांचा अमानुष अत्याचार हे एकच सांगता येईल. नाहीतर, सामान्यतः कुठेही तरुण पिढीबद्दल एक सुप्त तुच्छ वृत्ति असते. तशी ती फ्रान्समध्येही होती. पण एकतर विद्यार्थ्यांनी स्वतःपुरत्या केवळ संकुचित मागण्या केल्या नाहीत तर सबंध समाजाच्या दुःखावर बोट ठेवले होते आणि पोलिसांचे असे अत्याचार यापूर्वी फ्रान्समध्ये लोकांनी कधी पाहिले नव्हते. भारतात पोलिसांचे अमानुष वागणे अंगवळणी पडल्याने फ्रान्समधल्या पोलिसांच्या वागणुकीबद्दल आपल्याला एवढा संताप वाटत नाही. फ्रेंच लोकांना आपल्यासारखी सवय नसल्याने पॅरिसच्या चकमकीत तुलनेने मृत्युसंख्या कमी असली तरी, पोलिस अत्याचार ही गंभीर घटना वाटते. विद्यार्थ्यांवर मारपीट खूप झाली, विषारी वायु वापरले गेले, डोकी आणि हातपाय यांची हाडे मोडली गेली, पळणाऱ्यांचा पाठलाग करून झोडपण्यात आले, घरातून, कॅफेमधून विद्यार्थ्यांना बाहेर काढून मारण्यात आले. स्ट्रेचरवरचे जखमीदेखील सुटले नाहीत. विद्यार्थ्यांना पकडून त्यांचे तळहात तपासत आणि हाताला माती लागलेली दिसली तर त्याचा सरळ अर्थ त्याने 'बॅरीकेड्स्' (अडथळे) उभे करण्यात भाग घेतला असे गृहीत धरून बेदम चोपण्यात येई. तरुणासारखा चेहरा असणाऱ्या वयस्करांनाही विद्यार्थी समजून प्रसाद मिळाला! पॅरीसमधल्या डॉक्टरांच्या रिपोर्टवरून (न्यू स्टेट्समन, १७ मे १९६८, लंडन) पुढील माहिती मिळते. 'अश्रुधुराच्या बाँबमध्ये टीअर गॅस आणि इतर स्फोटक ज्वालाग्राही पदार्थ मिसळले होते, त्यामुळे केवळ धूर न होता जाळ होत असे.

पांढरा फॉस्फरस व इतर विषारी पदार्थ ह्यांच्या मिश्रणाचे प्लॅस्टिकग्रेनेडही टाकण्यात आले. अमेरीकन पद्धतीचा 'नर्व्ह गॅस' वापरण्यात आला आणि जाड-जूड दंडुक्यांनी डोकी व हातपाय मोडण्यात आले? पोलिसांच्या ह्या अत्याचाराची अतिशय तीव्र प्रतिक्रिया येवून सबंध समाज एकदिलाने विद्यार्थ्यांच्या मागे उभा राहिला. पुण्यात आलेल्या फ्रेंच लोकात भिन्न मताचे लोक होते पण विद्यार्थ्यांनी केले ते उथळपणाचे होते किंवा हुल्लडबाजीच्या अनेक प्रकारांपकी तो एक प्रकार होता असे एकाचेही मत नव्हते. जे घडले त्याविषयी प्रत्येकजण आदराने व पवित्र भावनेने बोलत होता. कट्टर गॉलिस्ट-देखील 'विद्यार्थ्यांच्या मागण्या न्याय्य आहेत पण द गॉल त्या सर्व सुधारणा घडवून आणतील' असे मत व्यक्त करतात. पण उलट रविवार दि. ४ ऑगस्ट १९६८ च्या केसरीत 'विध्वंसनबंद-मोर्चा' फेम गजेंद्र-गडकर स्टाइलवर लिहिलेले एक पत्र छापून आले. त्यावर फ्रेंच पाहुण्यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. 'बेजबाबदार विद्यार्थी आणि धूर्त कार्यकर्ते यांनी घातलेला बेबंद धुमाकूळ', 'खुशालचेंडू तरुणांचा वेळ जात नाही म्हणून हा उद्योग' असे भडक मथळे केसरीने त्या लेखास दिले होते. विद्यार्थ्यांना दांडगाईची व हुल्लड-बाजीची सवय म्हणून त्यांनी हे केले असा एकंदरीत सूर होता. कोणा एका फ्रेंच मुलीने पुण्यातील तिचे 'लेखणी मित्र' श्री. शशिकांत भोसले यांना ते पत्र पाठविले होते म्हणे! पाहुण्यांपैकी एका फ्रेंच युवतीने त्या पत्रावरचा आपला राग व्यक्त कर-ताना असे म्हटले की, मुलांच्यापैकी पॅरीसमध्ये असे कोणीच म्हणणार नाही. फ्रेंच लोकांपेक्षा तुमचीच मते त्या पत्रात दिसून येतात. त्या पत्रात काही नवीन माहिती, लक्षात न आलेली दुसरी महत्त्वाची बाजू किंवा काही मौलिक विचार असते तर गोष्ट वेगळी होती.

शेवटी शेवटी लोक कामावर जाऊ लागले म्हणजे संप बारगळला किंवा लोकांचे मतपरिवर्तन झाले असे घडले नसून अन्नधान्याची व्यवस्था कोलमडल्यामुळे व पगाराचा पैसा हातात नसल्याने गरीब वर्गावर उपाशी राहण्याची वेळ येऊ लागली. त्यामुळे लोकांना कामावर जाणे भाग पडले. जेवढे त्राण होते तेवढे त्यांनी पणाला लावले होते. पुढे कारखाने सुरू झाले तेसुद्धा पोलिसांच्या पहाऱ्यात!

## नव्या घोषणा

फ्रान्सचे विद्यार्थी अराजकप्रिय (Anarchist) आहेत असा आरोप नेहमी केला जातो. त्याबद्दल कानोसा घेताना ते खरे नसल्याचे कळले. सुव्यवस्था राखण्या-बद्दल व आपण सुव्यवस्थेच्या बाजूने आहोत असे जाहीर करणाऱ्या अनेक घोषणा विद्यार्थ्यांनी भिंतीवर लिहिल्या होत्या. ते नियंत्रणाच्या विरुद्ध नाहीत, पण नियंत्रण वस्तूंवर असावे माणसांवर नसावे असे त्यांचे म्हणणे होते. राजकीय मताच्या बाबतीत फ्रेंच माणसात बरीच भिन्नता दिसून येते किंवा द गॉलच्यापूर्वी कुठल्याही पक्षाचे स्थिर सरकार टिकले नाही म्हणून प्रत्येक फ्रेंच माणसाला स्वतःचा वेगळा

पक्ष असतो असे म्हटले जाते. पण याचा अर्थ ते अराज्यवादी आहेत असा होत नाही.

पॅरीसमधल्या भिंतीवर ज्याला जे वाटेल ते त्याने लिहीले होते. " Wall will speak out " (भिंती बोलू लागतील). हे कोहन–बेंडिट्चे वाक्य सुप्रसिद्ध आहे. नमुन्यादाखल भिंतीवर लिहिलेल्या घोषणा पुढे दिल्या आहेत.

' No Repression '– कोणाचा दबाव नको.

' Forbidden to Forbid '– मनाई करण्यास मनाई. '

' Imagination take power '– बुद्धिदेवते ! तुझे राज्य होऊ दे.

' When I will be tall I will be Policeman. '– ताडासारखे उंच वाढले की पोलीस होता येते !

' Revolution is not a performance '– क्रांती दुरून पहायची करमणूक नव्हे !

' I will not serve anybody, they will serve themselves alone. '– मी कोणाची चाकरी करणार नाही, प्रत्येकजण आपापले काम करील.

' Be salty, not sweety '– मिळमिळीत नको, तिखट बना.

' The weapons of criticism passed by the criticism of weapons.'

– ' Revolution is an initiative. '

– ' Action must not be Reaction, but a creation. '

– ' Yet ten days of happiness. '

– ' Be Realist and ask for the impossible. "

– ' Open the window of your Heart. '

नमुन्यादाखलच्या ह्या घोषणांतूनच विद्यार्थ्यांना कशासाठी क्रांती हवी हे स्पष्ट दिसून येते.

मे महिन्यातील घटनांची उलटसुलट बाजूने माहिती मिळवल्यावर तरुणांच्या संघटनेत काम करणारा एक कार्यकर्ता म्हणून माझ्या मनात जे विचार-तरंग उठले, ते येथे सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

यापूर्वीच्या जगातल्या क्रांत्या ज्या पद्धतीने घडून आल्या त्यामुळे क्रांतीविषयी काही परंपरागत कल्पना आपल्या डोक्यात ठाम बसलेल्या असतात. त्यामुळे १९६८ सालातील ही फ्रेंच क्रांती आहे असे मानावयास मन तयार होत नाही. बदललेल्या जगात सगळे संदर्भही नवे असतात. क्रांतीच्या कल्पनेतच क्रांती करणारी ही क्रांती आहे म्हणूनच आपण ती सर्व बाजूंनी समजावून घेणे आवश्यक आहे.

ही क्रांती राज्यक्रांती नसून माणसाच्या मनात अंतर्गत होणारी क्रांती आहे. तिचा अपरिहार्य भाग म्हणून अनुरूप राज्यक्रांती होणे आवश्यक आहे. भांडवलशाही समाजरचनेत शोषणास उपयुक्त अशी समाजाची संघटना उभी केली जाते.



**Revolution is not a prformance**

वस्तूंचे उत्पादन ह्या एकाच दिशेने सर्व कार्य चालते. माणसाला वस्तूंचा पुरवठा करण्यात येऊन त्याला जखडून टाकण्यात येते. माणसामध्ये खाणे-पिणे-राहणे-झोपणे, चैन करणे ही अंगे आहेत आणि त्याचबरोबर त्याचे ह्याव्यतिरिक्त आतले म्हणून काही व्यक्तिमत्त्व आहे. त्याशिवाय त्याच्या मनुष्यत्वाचा अर्थ पूर्ण होत नाही. त्याच्या पहिल्या अंगासाठी त्याला वस्तूंची गरज लागते. त्याच्या दुसऱ्या अंगाच्या पूर्तीसाठी त्याला प्रेम करायला वाव मिळाला पाहिजे, त्याच्यावर दुसऱ्याने प्रेम केले पाहिजे, विचारस्वातंत्र्य हवे, मनमुराद आनंदासाठी मुक्तता पाहिजे. भांडवलशाही समाजाने यंत्रशक्तीची उपासना करून उत्पादन वाढविले, वस्तूंची संख्या व प्रकार एवढे अमाप करून ठेवले की, या वस्तूंच्या पसाऱ्यात माणूस हरवला गेला. माणसासाठी वस्तू असण्याऐवजी वस्तूसाठी माणूस जगू लागला. आज वस्तूंचे अस्तित्व निश्चित झाले असून माणसाच्या अस्तित्वाला सुरुंग लागला आहे. यंत्रयुगात माणसाच्या स्थानापासून उखडला गेलेला माणूस पुनः आपले स्थान मिळविण्यासाठी धडपडत आहे. वस्तुंच्या उत्पादनासाठी अवाढव्य यंत्रणा उभी केली गेली व त्यातला एक क्षुल्लक भाग एवढेच माणसाचे स्थान उरले. भांडवलशाही पद्धतीत उत्पादन जास्त झाले की, ते खपविण्याचा प्रश्न मांडवलदारांपुढे उभा

राहतो. पूर्वीची पद्धत म्हणजे वसाहती, साम्राज्ये उभी करावयाची व त्या राष्ट्रातील लोकांना वस्तु विकत घ्यायला लावायच्या. दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्ये बुडाली, वसाहतवादाचा अंत झाला. मग आपल्याच लोकांनी वस्तु खरेदी केल्याशिवाय अन्य उपाय नाही म्हणून, माणसाच्या अंतर्गत भागावरच आघात होऊ लागला. भांडवलदार जाहिरातीच्या प्रगत तंत्राने लोकांच्या विचारांवर प्रभुत्व गाजवू लागले. वस्तु खपण्यासाठी सिनेमातील नटनटयांनी नव्या फॅशन्स करायच्या. रेडियो, टेलिव्हीजन, मासिके, वृत्तपत्रे, रस्त्यावरच्या पाटया, अशा प्रकारे माणूस जेथे जाईल तेथे त्याची विचारशक्ती नष्ट होऊन तो आपोआप त्या वस्तूंच्या सापळ्यात सापडेल अशी व्यवस्था निर्माण झाली. कामगार हा क्रांतीचा लढाऊ सैनिक पण त्यालाही कार-टेलिव्हीजन देऊन भांडवलदाराने त्याचा आत्मा मारून टाकला. तो वस्तूंना एवढा चिकटला आहे की, भांडवलशाहीविरुद्ध उभे राहण्याची त्याची इच्छाशक्ती आणि त्राण नष्ट झाले आहे. आहे हे हातून सुटेल की काय, म्हणून घाबराघुबरा झालेला हा मार्क्सचा क्रांतिसैनिक परिवर्तन नको म्हणू लागला. कन्झ्युमर्स सोसायटीमध्ये भांडवलदार किंवा उत्पादनव्यवस्थेतील वरचा वर्ग याव्यतिरिक्त इतर सर्वांना दुय्यम नागरीकत्व प्राप्त झाले. आताची फ्रेंच क्रांती ही गादीसाठीची क्रांती नसून, युरोपमधल्या माणसाच्या आत्म्याचे बंड आहे. युरोपमध्ये सर्वच ठिकाणी वस्तु आणि माणूस यांच्यात द्वंद्व सुरू झाले. भांडवलशाहीने अन्न, वस्त्र, निवारा ह्या मूलभूत गरजा भागवून कम्युनिझमधला जोर काढून घेतला, त्याची धार बोथट करून टाकली. पण मूलभूत गरजा देऊन त्यामोबदल्यात जे हिसकावून घेतले ते माणसाला अतिमूल्यवान् वाटणारे व त्यातच त्याचे सारे मनुष्यपण सामावले आहे असे आहे. टेकनॉलॉजीकल सोसायटीमध्ये व्यक्तिमत्वाला कवडीचे स्थान आहे. मनाप्रमाणे जगण्याचा हक्क नाही. माणसाने त्याच्या आशाआकांक्षासहित त्याने काय व्हायचे, काय करायचे, विचार कसा करावयाचा, चैन कितपत करावयाची इत्यादी सर्व गोष्टी भांडवलशाही ठरविते. माणसातला माणूस नेमका बाजूला काढून उरलेल्या कलेवरावर, अधिसत्ता प्रस्थापित केली गेली. माणसाच्या ह्या बदललेल्या संदर्भानुसार समाजाचे संघटन व ते टिकविण्यास आवश्यक असलेले शासन उभे करण्यात आले.

## नव्या शक्तीचा उदय

नेहमीच्या क्रांतीचा अग्रदूत 'कामगार' बाद झालेला. अशा परिस्थितीत बंड कोणी करावयाचे? फक्त एकच शक्तिक्रांती करण्याची शक्यता होती. ती म्हणजे 'विद्यार्थी–वर्ग.' त्याला नवीन नाव आहे 'College Proletariat' :कारण त्याला प्रचलित समाजरचनेने अद्यापी गिळलेले नाही. आपले काही हिरावून घेतले गेले आहे ते परत मिळविले पाहिजे ते समजण्याची ज्याची बौद्धिक कुवत व सामर्थ्य शिल्लक आहे असा तो एकमेव वर्ग आहे. शिवाय विद्यापीठातून तो आपोआपच

संघटीत झालेला असतो. खऱ्या अर्थाने पहाता त्याला वर्ग म्हणून संबोधता येत नाही; कारण त्याचे हितसंबंध सर्वस्वी एकच असतात असे नाही. पण ती एक शक्ती आहे. सध्या अमेरिकेत 'काळी शक्ती' व युरोपात ही विद्यार्थी–शक्ती उदयाला आली आहे. प्राग, रोम, बर्लिन, लंडन, पॅरीस, स्टॉकहोम, माद्रिद, बॉन अशा सगळ्याठिकाणी ही शक्ती आपले सामर्थ्य दाखवू लागली आहे.

फ्रान्समध्येच या शक्तीचा सर्वात मोठा स्फोट झाला. याला सर्व युरोपात असलेली सर्वसाधारण कारणे तर तेथे आहेतच; पण त्याचबरोबर फ्रान्सची म्हणून काही खास कारणे आहेत. मूळातच फ्रान्सजवळ एक वेगळी परंपरा आहे. ज्या ज्या वेळी जग एखाद्या कोंडीत सापडते त्या वेळी फ्रान्स त्याला वर काढतो. नवे विचार, नवी मूल्ये, नव्या सूचना फ्रान्समध्येच उदयाला येतात. फ्रान्समध्ये त्या मूल्यांचा, विचारांचा पराभव होतो पण, जगभर ह्या कल्पना पसरतात व जग बदलून टाकतात. १८१७ साली पहिल्या फ्रेंच राज्यक्रांतीने 'स्वातंत्र्य–समता–बंधुत्व' ही तत्वे जगाला दिली. फ्रान्सच्या मंथनातून निघालेल्या ह्या नवनीताचे ढादरे अजूनही जगाला बसताहेत. १८७१ साली पॅरीस–कम्यून फ्रान्समध्य अयशस्वी झाले, पण रशियाने त्यापासून प्रेरणा घेऊन, तेथे ती तत्त्वे यशस्वी करून दाखविली. आता फ्रान्सने 'मे क्रांती'चे मंथन करून 'Participation' व 'Dialogue' ही तत्वे सापडविली. जगाला ही तत्वे देऊन भांडवलशाही व कम्युनिझम ह्यांच्या कोंडीतून बाहेर पडण्यास नवा मार्ग दाखविला आहे. मे १९६८ नंतर जगभर नवे विचारमंथन सुरू झाले आहे. कदाचित खुद्द फ्रान्समध्ये ही क्रांती यशस्वी होणार नाही. पण जग बदलण्याचे सामर्थ्य त्या क्रांतीमध्ये निश्चित आहे.

गेल्या दहा वर्षात द गॉलने फ्रान्स देशाचे नाव वर नेले. 'राष्ट्राची शान' ह्या गोंडस शब्दाच्या मोहात लोकांना दहा वर्षे अडकविले. राजकीय स्थैर्याच्या नावाखाली हुकूमशाहीची आवड लावली. तशी शिक्षणपद्धती आणली. राष्ट्रीय इभ्रत वाढविणाऱ्या भव्य इमारती, तलाव, बागा, नाट्यगृहे इत्यादी योजना अंमलात आल्या; पण घरासारखा मूलभूत प्रश्न बाजूला पडला. एका बाजूला फ्रान्सची भरभराट झाली पण दुसऱ्या बाजूला बेकारांची संख्या पाच लाखावर गेली. एक लक्ष सत्तर हजारावरून पाच-सहा वर्षांतच विद्यार्थ्यांची संख्या सहा लाखावर गेली. अणुबाँबला पैसा आहे पण क्लासरूम बांधायला पैसा नाही. परदेशी पाहुण्यांची सोय करायला पैसा आहे, पण शिक्षकांची संख्या वाढवायला पैसा नाही. विद्यार्थी जास्त झाल्याने पदोपदी परीक्षा आल्या. ७०–८० टक्के विद्यार्थी नापास केले म्हणजे परीक्षेचे स्टँडर्ड उच्च दर्जाला पोहोचले अशा समाधानात लोक राहू लागले. भांडवलशाहीच्या शोषण यंत्रणेत कार्यक्षम (शोषणक्षम) माणसे पाहिजेत म्हणून व त्यासाठी आवश्यक असलेली 'आपण इतरांपेक्षा उच्च दर्जाचे आहोत' ही जाणीव रुजविण्यासाठी आपल्याकडच्या 'पब्लिक सर्व्हिस कमिशन' प्रमाणे 'Eco-

le Normale Superieure' च्या परीक्षांना अवास्तव महत्त्व आले. त्यांच्या अतिशय चुरशीच्या परीक्षा होतात व ९० टक्के लोक निकामी ठरवून १० टक्के लोक वरच्या पायरीवर सोडले जातात. प्रत्येक पायरीवर परीक्षा असते. दर्जाच्या चढत्या विषमतेने समाजाची बांधणी केली गेली. साहजिकच ज्याचे आई-वडील वरच्या हुद्यांवर व जे शहरात राहतात त्यांना अधिक संधी मिळून वरचा दर्जा मिळविणे सोपे जाऊ लागले. आपल्याकडे आर्मी ऑफिसरचा मुलगा आर्मीत सहज ऑफिसर होऊ शकतो त्याप्रमाणे ! म्हणजे कोणत्या कुटुंबात जन्माला आला त्यावर सामाजिक स्थान मिळू लागले. हे पाहिल्यावर हिंदूंची जातिसंस्था आणण्याचा त्यांचा विचार होता की काय ? अशी शंका येते. ५० टक्के मुले सायन्स कॉलेजचे शिक्षण पुरे करून पदवीवाचून परत जातात. जीवन-कलहाचा एवढा दबाव असताना फ्रेंच मनुष्य क्रांतीचा विचार कसा करू शकतो असा प्रश्न मनात डोकावून जातो. कारण, परिस्थितीचा ताण व फुरसतीचा अभाव हेच कारण आपण राजकारणाविषयी विचार न करण्याबद्दल नेहमी सांगत असतो. फ्रेंच माणसाचा क्रांतिकारक पिंड कायम राहण्याचे कारण म्हणजे फ्रेंच माणसाला कितीही कचरा शिक्षण मिळाले तरी पहिल्या फ्रेंच राज्यक्रांतीचा अभिमान त्याच्या रोमारोमात भिनलेला असतो. 'स्वातंत्र्य-समता-बंधुत्व' ह्या तत्वावर त्याचा पिंड पोसला जातो. ह्या तत्वांची पायमल्ली होऊ लागली की, फ्रान्सचा आत्मा बंड करून उठतो व वाटेल ती किंमत मोजावयास सिद्ध होतो.

## वैचारिक मार्गदर्शन

क्रांतीच्या यशस्विततेसाठी राज्यशासनापेक्षा क्रांतिकारकाजवळ जास्त शक्ती असावी लागते. विसाव्या शतकात विज्ञानाची शक्ती पाठीशी असल्याने शासन-संस्था इतकी प्रबळ झाली आहे की, प्रचलित राजवट उलथून टाकणे पूर्वीच्या मानाने अवघड किंबहुना अशक्यप्राय होऊन बसले आहे. असंतोष असलेली माणसे एकत्र येऊ लागली की, मुळातच त्यांचे संघटन या ना त्या उपायाने नष्ट करण्यात येते. अशा रीतीने क्रांतिकारकांच्या मागे संघटित शक्ती उभी राहू शकत नाही. कामगार, कारखान्यामुळे संघटित असतो. पण त्याच्या तोंडावर बोनस, पगारवाढ वगैरे मामुली तुकडे फेकले की सबंध समाजपरिवर्तन करण्याचा तो विचार करीत नाही. अशा ह्या कठीण अवस्थेत प्रा. हर्बर्ट मार्क्युज, मा. रेगीस डेब्रे, जीन पॉल सार्त्र, ह्या विचारवंतांनी नवे विचार दिले. मार्क्युज, रेगीस डेब्रे, माओ, ट्रॉटस्की, कॅस्ट्रो, गेव्हारा, जीन पॉल, सार्त्र ह्या माणसांच्या विचारांचे मार्गदर्शन एकलव्या-प्रमाणे घेऊन पॅरीसच्या विद्यार्थ्यांत छोटेछोटे गट निर्माण झाले. माओचा संदर्भ आपल्या देशात जो आहे तो फ्रान्समध्ये नाही हे समजून घेतले पाहिजे. आपल्या-कडे माओची भक्ती म्हणजे शत्रुनिष्ठा, राष्ट्रद्रोह, असा अर्थ आहे. फ्रान्समध्ये तसा अर्थ करण्याचे कारण नाही. चौ-एन-लाय सारखे अनेक पुढारी चीनच्या राज्य-

क्रांतीपूर्वी पॅरीसमध्येच शिक्षण व प्रेरणा घेऊन आले होते. माओला तरुण लोक आदर्श मानतात याचे कारण तरुण मनाची अस्मिता तो जागृत करतो. त्याच्या लिखाणात व विचारात तरुणाला अग्रस्थान आहे. माओ मार्क्सकडेदेखील कशा दृष्टिकोनातून पाहतो हे बघण्यासारखे आहे. त्याचे प्रसिद्ध वाक्य म्हणजे 'आपल्या लिखाणाद्वारे मार्क्सने हजारो सत्ये सांगितली आहेत, पण ती सर्वच उकळून, घोटून काढली तर एकच एक सत्य उरते की, 'तरुणांनो तुम्हाला बंड करण्याचा हक्क आहे.' मार्क्युजने टेक्नॉलॉजीकल सोसायटीमधील व्यथेवर नेमके बोट ठेवल्याने त्याचाही प्रभाव तरुण पिढीवर खूप आहे. सॉरबॉनचा सोशॉलॉजीचा गट मार्क्युजला मानतो. रेगीस डेब्रो ह्या फ्रेंच प्राध्यापकाचे क्यूबाच्या क्रांतीत महत्त्वाचे स्थान आहे. क्यूबन क्रांतीचा शिल्पकार म्हणून तो ओळखला जातो. विद्यार्थी वर्ग तरंगता वर्ग (Floatingclass) असल्याने त्याचे निश्चित विचारसरणीवर आधारलेले कडवे संघटन उभे राहू शकत नाही ही जाणीव असल्याने विद्यार्थ्यांत आत्मविश्वा-


'नाटच-श्री निर्मित, श्रीकृष्ण पोंक्षेलिखित खानदानी नाटक—'

# सतीचं वाण

*स्वातंत्र्ययज्ञात जीवनसर्वस्वाची समिधा समर्पित करणाऱ्या मानिनीची हृदयंगम कहाणी !*

*दिग्दर्शक* **भालचंद्र रणदिवे** | *नेपथ्य* **सखाराम भावे** | *पार्श्वसंगीत* **कुमारसेन गुप्ते**

प्र. भू० : वत्सला देशमुख, सुमन आरेकर, विनायक जोशी, नंदा फडके, मोहन कोठीवान, वसंत खरे, नाना ओक, राजा नाईक, श्रीकृष्ण पोंक्षे

११ ऑक्टो. नाशिक : १३ ऑक्टो. संघमंदिर : १५ ऑक्टो. रवींद्र नाट्यमंदिर : २३ ऑक्टो. शिवाजी मंदिर : २४ ऑक्टो. पासून कोकण दौरा !

प्रयोगासाठी : राम खांडेकर, १४ डी, झावबावाडी, ठाकुरद्वार, मुंबई–२८

साचा अभाव होता. संघटनेअभावी क्रांतीचा, प्रत्यक्ष कृतीचा म्हणजे उठावाचा विचार त्यांच्यामध्ये रूजला नव्हता. हा न्यूनगंड प्रा. हर्बर्ट मार्क्युज व प्रा. रेगीस डेब्रे ह्यांच्या विचारांनी दूर झाला. त्यांच्या म्हणण्यानुसार क्रांतीसाठी अगदी पक्की विचारसरणी – ज्यात सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न आहे – अशी असण्याची आवश्यकता नाही. क्रांती ही पुन: पुन्हा व्हावी लागते. फक्त तिचा चेहरा परिस्थितीप्रमाणे बदलतो. काही मानवी मूल्ये डोळ्यांसमोर ठेवून चुकीच्या गोष्टींवर प्राणांतिक हल्ले चढविले पाहिजेत. अवाढव्य संघटना, कडव्या विचारसरणीचे कार्यकर्ते ह्यांच्यासाठी थांबू नका. आपल्या 'क्रांतीमध्ये क्रांती' (Revolution in Revolution) ह्या पुस्तकात रेगीस डब्रे म्हणतो, "ज्याच्या मनात क्रांतीची तीव्र तळमळ आहे तो क्रांतिकारक आणि जो उठाव करतो तो क्रांतीचा सैनिक!" एवढे सोपे समीकरण आतापर्यंत कोणी सांगितले नव्हते. "उठाव करताना छोटया टोळयांनी लढा द्या. आपापसात संपर्क ठेवण्याच्या भानगडीत पडू नका. कारण, प्रचलित राजवट फार शक्तिमान आहे हे लक्षात ठेवा. क्रांतीसाठी रेजिमेंटेशनने तयार केलेली मार्क्सिस्ट किंवा लेनिनिस्ट पार्टी हवी असे बिलकुल नाही. लोकांच्या अंत:करणातील खरे दु:ख असेल तर लोक आपणहून उठाव करतात. क्रांती हा प्रत्येकाचा हक्क आहे. ती विशिष्ट पक्षांची खास मक्तेदारी नाही." अशा विचारांनी विद्यार्थिवर्गाला खूप दिलासा व आधार सापडला. परवाच्या घटनात विद्यार्थ्यांनी ज्या पद्धतीने डावपेच वापरले किंवा ज्या पद्धतीने पोलिसांना अडथळे (बॅरीकेड्स) उभे केले त्यात व क्यूबाच्या क्रांतीत विलक्षण साम्य आहे. ज्याप्रमाणे क्यूबाची क्रांती अमूक एका विचारसरणीच्या आधारे खुलासा करून सांगता येत नाही तसेच ह्या मेच्या क्रांतीचे आहे.

व्यथा सगळयांची असली तरी ती पुढे मांडण्यात कोणीतरी पुढाकार घ्यावा लागतो. सॉर्बॉन विद्यापीठाला संलग्न असलेल्या नॉंटेरे ह्या विद्यापीठातला, तेवीस वर्षांचा धडाडीचा तरुण सोशॉलॉजीचा विद्यार्थी डॅनियल ह्याने ह्या क्रांतीत पुढाकार घेतला. आकर्षक व्यक्तिमत्वाचा हा तरुण उत्तम वक्ता आहे. लोकांच्या पोटातले शब्द आपल्या ओठातून बोलण्याची कला त्याने साध्य केली आहे. अतिशय परखडपणे व सुस्पष्टरित्या तो आपले विचार मांडतो. नव्या घोषणा, नवे वाक्प्रचार तयार करण्याची असामान्य बुद्धिमत्ताही त्याच्याजवळ आहे. त्याचे आईवडील नाझी जर्मनीतील निर्वासित असून त्याचे सर्व शिक्षण फ्रान्समध्येच झाले. त्याच्याखेरीज कुटुंबातील इतर सर्वांना फ्रेंच नागरीकत्व मिळाले आहे. जर्मन नागरीकत्व असलेला हा तरुण त्याच्या तांबडया केसामुळे आणि क्रांतीकारक विचारांमुळे 'डॅनियल-द-रेड' म्हणून प्रसिद्ध आहे. मध्यंतरी जर्मनीतून गुप्तपणे फ्रान्समध्ये येताना ओळख पटू नये म्हणून त्याने काळा कलप लावून घेतला. तो आणि त्याचे सोशॉलॉजीचे इतर मित्र असा छोटा गट सुरुवातीस होता. पण शिक्षणमंत्र्यांना जाहीर सभेत अवघड

प्रश्न विचारल्याने खळवळ माजली आणि हा गट एकदम प्रकाशात आला. तेव्हा-पासून हा गट 'बावीस मार्च' गट ह्या नावानेच ओळखला जातो.

## मे क्रांती !

व्हिएटनाम युद्धाच्या विरुद्ध निदर्शनाला परवानगी, विद्यापीठाची सरकारी हस्त-क्षेपापासून स्वायत्तता, त्यांची पुनर्रचना, परीक्षापद्धतीत सुधारणा, विद्यार्थी-शिक्षक संबंध ह्यावरून मार्चपासून सारखी कुरबूर चालू होती. पण एके दिवशी अचानक विद्यापीठ बंद करून पुढील सर्व घटनांना सुरवात करण्याचा अग्रमान नाटेरेच्या डीनने मिळविला आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता विद्यापीठ बंद करण्यात आले. आपल्या विद्यापीठाची बंद दारे व तेथे असलेला पोलिसाचा पहारा पाहून विद्यार्थी चिडले. ३ मे पासून पोलिस व विद्यार्थी यांच्यातील चकमकी सुरू झाल्या. सॉर्-बॉनमध्येदेखील पोलीस आणले होते. त्याची इतकी तीव्र प्रतिक्रिया झाली की, कोणाच्याही आदेशावाचून, कोठल्याही योजनेवाचून सॉरबॉन विद्यापीठाच्या बाहेर हजारो विद्यार्थी गोळा झाले. कोहन-बेंडिट्च्या छोटया गटाला एका रात्रीत सर्व विद्यार्थ्यांचा व छोटयामोठया गटांचा पाठिंबा प्राप्त झाला. अविकृत विद्यार्थी युनियनने (UNDF) देखील लढाऊ पवित्रे घेतले. पुढे सतत 'लॅटिन क्वार्टर' जेथे पॅरीसमधील विद्यापीठे आहेत हे ठिकाण क्रांतीचे स्थान म्हणून झळकत राहिले. विद्यार्थी-पोलिसांच्या चकमकी, अश्रुधूर, लाठीहल्ला, ह्याने हा भाग गजबजून गेला. पुढे लाखो लोकांचे मोर्चे प्रचंड निदर्शने झाली. पॅरीसच्या भिंती नव्या घोषणांनी भरून गेल्या. निदर्शकांवर अत्याचार सुरू झाले. एका विद्यार्थ्याच्या मागे पोलीस शिकाऱ्याप्रमाणे लागले असता तो समुद्राकडे गेला व बुडून मेला. हाच मे महि-न्याचा पहिला बळी ! १०-११ मेला पाशवी अत्याचाराचा कळस झाला. पॅरिसच्या ५ पैकी ४ नागरिकांचा विद्यार्थ्यांना संपूर्ण पाठिंबा होता. १३ मेला कामगारांनी विद्यार्थ्यांच्या मागोमाग उडी घेतली. या वेळी बहुतेक सर्व मंत्री पॅरीसच्या बाहेर होते. पंतप्रधान पाँपिदु अफगाणिस्थानमध्ये होते तर द गॉल ब्युखारेस्टला गेले होते. पॅरीसमध्ये पोलीस प्रमुखाचे राज्य होते. आता विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी कामगारात संपाची लाट सुरू झाली. विद्यार्थ्यांच्या पाठिंब्याबरोबरच त्यांच्या मागण्याही त्यांनी पुढे मांडल्या. सार्वत्रिक संपामुळे भांडवलशाहीचा आत्मा असलेली उत्पादनव्यवस्था लुळी पडू लागली. शेवटी ८० लाख कामगार संपावर होते. नंतर द गॉल आले पण तोंडात मीठाची गोळी धरून बसले. एक शब्दही तोंडातून काढेनात. सगळा फ्रान्स त्यांच्या शब्दासाठी वाट पहात होता. अखेर २४ मेला द गॉलचे राष्ट्राला उद्देशून पहिले भाषण झाले. पुढे त्यांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे अत्यंत आणीबाणीच्या वेळी द गॉल पॅरीसपासून दीडशे मैलावरच्या आपल्या खेडयात विश्रांतीसाठी निघून गेले. 'तुम्हाला मी नको असेन तर मी परत माझ्या गावी चाललो.' ही धमकी द गॉल प्रत्येक वेळी देतात. शेवटी आता ते इतके हास्यास्पद

झाले आहे की, फ्रेंच मनुष्य घाबरत नाही. कुणी परत न बोलाविता, द गॉल आपणहून परत येतात. मे महिन्याच्या अखेरीस द गॉलने राष्ट्रीय लोकसभा विसर्जन करून जूनमध्ये निवडणुका जाहीर केल्या. त्याच वेळी वेळ पडल्यास मला आणखी अधिकार हातात घ्यावे लागतील असा दमही देऊन ठेवला. निवडणुकीत गॉलिस्ट विजयी झाले. विद्यार्थी व कामगारांच्याबरोबर उलटसुलट राजकारण खेळल्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने आपली मते गमावली. कोणी तर म्हणतात कम्युनिस्ट व द गॉल यांचे गुप्त संगनमत झाल्यावरच द गॉलने निवडणुका घेण्याचा धोका पत्करला. द गॉलचा विजय झाल्याने फ्रान्सला लागलेल्या क्रांतीच्या वेणा तात्पुरत्या थांबल्या आहेत. क्रांतीचे बालक सुखरूप जन्माला येणार की, पोटातच मरणार हे आता काळच ठरवील.

## आणि भारत

नव्या युगात 'विचार' हे अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. नव्या विचारांचे लोण एकदा फैलावू लागले म्हणजे कोणी थोपवू शकत नाही हे ह्या क्रांतीने सिद्ध केले आहे. भारताच्या संदर्भात ही वस्तुस्थिती लक्षात घेणे अवश्यक आहे. कारण प्रचलित परिस्थितीमध्ये परिवर्तनासाठी इतर शस्त्रे वापरण्यात येऊ लागली तर त्यांचा विजय कधीच होणार नाही. कारण 'जैसे थे' शक्तीच्या हातात हत्यारे व इतर सर्व साधने आहेत. शेवटी विचार एवढेच परपक्षाकडे नसलेले हुकमी शस्त्र हाती रहाते. अजून बऱ्याच गोष्टी ह्या क्रांतीमधून शिकण्यासारख्या आहेत. भारतात क्रांतीसाठी नेमका कुठला वर्ग उपयोगी पडेल हा यक्षप्रश्न सर्वच परिवर्तनवादी पक्षांपुढे आहे. ज्यांना आहे ही रचना बदलावयाची नाही, त्यांची गोष्ट सोडली तर साधारणतः डावे पक्ष परिवर्तन हवे असे म्हणणारे आहेत. परंपरागत कल्पनेने कामगार वर्ग क्रांतीचा मक्तेदार मानण्यात मुख्यतः दोन अडचणी आहेत. पहिली अडचण म्हणजे पुरेसा कामगारवर्ग तयार होण्यासाठी, तेवढे औद्योगीकरण होऊन कारखाने निघाले पाहिजेत. दुसरी अडचण म्हणजे, आपल्याकडे दारिद्रय एवढे भयंकर आहे की, ज्याला काम मिळते तो उपासमारीपासून सुटका झाली म्हणून लगेच बूर्ज्वा बनतो. तुलनेने कामगार सुस्थितीत असल्याने त्यांचा लढाऊपणा नष्ट होतो. किंबहुना आहे हे टिकवावे अशा मताचा तो बनतो. तो राजकीय दृष्टया अतिशय मागासलेला असल्याने लढलाच तर वैयक्तिक मागण्यांसाठी लढतो. बोनस, पगार यापलीकडे तो इतर राजकीय मागण्यांसाठी संपाचे शस्त्र वापरीत नाही. श्रमिकांची वर्ग जाणीव (Class conscious) जागृत करणे हे इथल्या परिस्थितीत अशक्यप्राय वाटते. त्याच्यावर जातिसंस्थेचा, धर्मभावनेचा, प्रांतभावनेचा पगडा अधिक असल्याने वर्गजाणीव पराभूत होऊन इतर संकुचित वृत्ती निर्णायक ठरतात. त्याचे अगदी अलीकडचे उदाहरण घेता येईल. आयुष्याचा होम करून कम्युनिस्टांनी ज्या कामगारसंघटना अविरत परिश्रमाने बांधल्या त्या शिवसेनेची हवा आल्याबरोबर

धडाधड कोलमडून पडल्या. कामगारवर्गाचे लढाऊ नेतृत्व करून त्यांच्या आर्थिक मागण्या यशस्वीरीत्या पुऱ्या करून देणारा जॉर्ज फर्नांडिस चार महिने दिल्लीत गेल्याबरोबर मुंबईत त्याची पकड ढिली पडू लागते ही गोष्ट कामगार वर्गाची राजकीय समज प्रौढ झाल्याचे द्योतक खास नव्हे. अशा परिस्थितीत भारतातील क्रांती फक्त दोनच शक्ति करू शकतात. त्या म्हणजे ज्याच्या ज्याच्यावर म्हणून अन्याय घडेल त्याला त्या अन्यायाविरुद्ध लढायाला सिद्ध करून, त्याच वेळी त्याचे व्यापक राजकीय शिक्षण करणे व अशा रीतीने दलित शक्ती देशभर उभी करणे, ' विद्यार्थी-शक्ती ' देशामध्ये उदयाला येतेच आहे. तिचे सामर्थ्य व परिवर्तनाची आकांक्षा आणि क्षमता आपण नीट जाणून घेतली पाहिजे. उत्तर भारतात जे राजकीय, सामाजिक, आर्थिक परिवर्तन सुरू झाले त्याला उत्तर भारतातील विद्यार्थी-आंदोलने कारणीभूत आहेत. देशभर फुटकळ संघर्षामधून विखुरलेली विद्यार्थी–शक्ती मोकळी करून तिला परिवर्तनाच्या व्यापक आंदोलनात गोवले पाहिजे.

धर्म, भाषा, इतिहास यांचे धागे देशाला एकत्र बांधायला उपयोगी ठरत नाहीत असे लक्षात आल्यावर दारिद्र्याची समान व्यथा एवढा एकच धागा आसेतुहिमाचल समान आहे. ज्या क्षणी ' दलित-शक्ति ' व ' विद्यार्थी–शक्ती हातात हात घालून काम करू लागतील त्या दिवशी भारतातील क्रांती कोणी अडवू शकणार नाही. मे महिन्यातील फ्रेंच क्रांतीचा आपल्याला हाच संदेश आहे असे मला वाटते. तिकडचा समाज औद्योगीकरणामुळे अस्वस्थ नसून विषमतेमुळे व माणसाच्या अप्रतिष्ठेमुळे अस्वस्थ आहे. नाही तर औद्योगीकरणावर राग वाढतो, हे धोक्याचे आहे कारण फ्रेंच क्रांतीकडे बोट दाखवून ' बघा, भाकरी मिळूनसुद्धा माणूस सुखी नाही', ' कारखाने काढले तरी समाधान नांदत नाही ' असा बकवा करून बुद्धिभेद केला जातो. औद्योगीकरणपूर्व काळात (Pre Industrial era) मध्ये माणसाला परत नेण्याची ही भावडी धडपड तरी असते किंवा ' जैसे थे ' परिस्थिती कायम ठेवण्यासाठी, भाकरीच्या प्रश्नाला कमी लेखण्यासाठी, श्रमिकांचे शोषण चालू ठेवण्यासाठी, दुसऱ्याच्या घामावर आपला विकास साधण्यासाठी, धर्माच्या माध्यमातून आपले वरचे स्थान टिकविण्यासाठी अत्यंत धूर्तपणे केलेला तो प्रचार असतो.

भारतात प्रत्येक पोटात भाकरी गेली पाहिजे, प्रत्येकाच्या डोक्यावर छप्पर मिळाले पाहिजे, प्रत्येकाला लाज झाकता आली पाहिजे, मरणाऱ्याला औषध मिळाले पाहिजे, असे वाटत असेल तर औद्योगीकरण व यंत्रशक्तीची उपासना आवश्यक आहे पण त्याचबरोबर यंत्रशक्तीने निर्माण केलेल्या संपत्तीचा फायदा मूठभर महामानवांना मिळून बाकीच्यांना मुक्या प्राण्यांचे स्थान मिळू नये असे वाटत असेल तर प्रत्येक तरुणाने म्हटले पाहिजे –

' मे क्रांती चिरायू होवो '–' Long live May Revolution. '

O

त्या बातमीने सारं शहर ढवळून निघालं होतं. एक साधा हमाल आणि अशा प्रकारचे काम करील हे कोणाच्या स्वप्नातही नव्हते. पण घडले खरे, आणि वर्तमानपत्रात प्रसिद्धही झाले.

मोतीराम साधा हमाल होता. दिवसभर हमाली करून पोट भरणारा. व्यापाऱ्यांनी दिलेल्या रसिदी घेऊन जायचा, माल आला असल्यास सोडून आणायचा आणि त्याचा योग्य मोबदला घेऊन गुजराण करायचा. रसिदीप्रमाणे आपला माल ताब्यात मिळतो. जकातीची दगदग नाही. यामुळे व्यापारी त्याला रसिद देऊन मोकळे होत व आपला होणारा त्रास वाचवीत. पोटाला मिळते मग कशाला उगाच लबाडी करा अशा प्रामाणिक आणि सोज्वळ विचारांचा मोतीराम सर्वांच्याच चर्चेचा विषय झाला होता.

तसं पाहिलं तर त्याच्याकडे पाहिल्यावर तो असलं काम करील यावर विश्वासच बसणार नाही कुणाचा. साध्या आणि सरळ विचारांचा मोतीराम आणि त्याचे हातून असले कृत्य ? " छे बुवा ! विश्वासच बसला नाही आपला !" असंच प्रत्येकजण ती बातमी वाचून म्हणत होतं.

# पुनर्जन्म

स ती श कु मा र लो हा डे

पण घडलं मात्र खरं. "त्यानं एका तरुण मुलीला पळवून नेलं." ही बातमी प्रसिद्ध झाली होती आणि शहरातील त्या भागातील राहणाऱ्या लोकांनी हे दृश्य डोळ्यानं पाहिलं होतं. " कुणाला सांगू नको बरं का ?" असं प्रत्येकजण प्रत्येकास सांगून आपण अगदी त्या गावचेच नाही असे दाखवीत होते.

ऐकणारे अगदी गंभीर चेहरा करून आणि छातीवर हात ठेवून सांगत होते तरी माझा त्या गोष्टीवर विश्वास नव्हता. मोतीरामला गेल्या दहा वर्षांपासून मी ओळखीत आहे, नव्हे होतो. त्याची माझी दिवसातून एकदाही बैठक झाली नाही असा एकही दिवस गेला नाही. त्याच्या स्वभावाच्या



खाचा–खोचा व वागण्यातील खाचखळगे मला तोंडपाठ झाले होते. त्याला नाना तऱ्हेने छेडून मी त्याची परीक्षा घेतली होती. परंतु तो अगदी शंभर नंबरी सोनं ठरला होता. त्याची बायको मरून ३–४ वर्षे झाली होती. या नंतर त्याने लग्न करावे म्हणून पुष्कळांनी प्रयत्न केले होते. त्याचं यावर उत्तर तयार असे. "एकदा वाहिलेलं फूल परत वाहायचं नसतं." किती उदात्त विचार होते त्याचे ! मग त्याने हे काम केलं कसं, हा प्रश्न सर्वांपुढं दत्त म्हणून होताच. काही काही तर अगदी स्पष्ट म्हणत असत "मुहमे राम और बगलमे छुरी !" माझंही मन दोलायमान होई आणि त्याच्याकडं साशंक नजरेने मीही पाहावयास लागलो. त्या दिवसानंतर मी त्याचा चेहरा फार वेळा निरखून पाहिला. पण त्याच्या चेहऱ्यात मला फरक दिसून आला नाही. त्याचा पूर्वीचा हसरा चेहरा आणि तीच पूर्वीची त्याची निष्पाप वृत्ती. हा प्रकार घडून आता बरेच दिवस झाले होते. त्याचा माझा रोजचा संबंध असल्याने त्याच्या बाबतीतले विचार मनात आल्याशिवाय रहात नसत. अखेर या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावायचा ठरवून एक दिवस तो हमालीचा हिशेब घ्यावयास आल्यावर त्यास थांबावयास सांगितले. मी शिल्लक वगैरे मिळवली आणि त्यास घेऊन हॉटेलमध्ये गेलो.

या माझ्या वागण्याचा त्याला अचंबा वाटला. रोज आपण चहा पाजा म्हणून तोंडाने सांगत असतानासुद्धा कधी यांनी चहा पाजला नाही ते आज आपण होऊन

चहा का पाजतात, याचा त्याला उलगडा होईना. हॉटेलात एका कोपऱ्यात आम्ही बसलो होतो. इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. हळूच मी मुद्याला हात घातला. माझ्या मनातील आशय त्याच्या लक्षात आला असावा. सुरुवातीस त्याने उडवा-उडवीची उत्तरे द्यावयास सुरुवात केली. पण जेव्हा त्याचा पुरताच पिच्छा पकडला तेव्हा त्याने सांगण्यास सुरुवात केली.

"भाऊ, फार लोकांनी मला छेडलं. प्रत्येकजण माझ्याकडं साशंक नजरेने पहात होता. मनातून मला त्यांची चीडही यायची. पण मी कधीही कुणाला बोलून दाखविले नाही. जेव्हा जेव्हा मी तुमच्या चेहऱ्याकडे पाही तेव्हा तेव्हा तुमचा बोलका चेहरा मला सांगे " तू निर्दोष आहेस. एवढ्या मोठ्या महासागरात एखाद्या बेटाप्रमाणेच वाटायचे तुम्ही मला. त्यामुळे मनाला थोडासा दिलासा वाटे. आणि आपली परीक्षा करणारं जगात कोणीतरी आहे याचे सात्त्विक समाधान वाटे." भाऊ अजून मी कोणाजवळ बोललो नाही. फौजदाराने फार छेडले मला. पण मी फुटलो नाही. पण आता असे वाटते की तुमच्यापुढे भडभड ओकलो तर मनावरचे ओझे हलके होईल.

माझ्याबद्दलचे त्याचे विचार ऐकून मला बरे वाटले. म्हणून मी त्याचे जवळ जास्तच हट्ट धरला.

"भाऊ, स्टेशनच्या रस्त्यानेच दिवसभर मला वावरावे लागते. रहदारी बंगला सोडल्यावर एक आडवी गल्ली लागते पहा. त्या ठिकाणची ही घटना. त्या गल्लीच्या शेवटच्या घरात एक पोक्त बाई रहाते. आणि तिच्या घरात नेहमी ३–४ मुली दिसायच्या. तरण्याताठ्या, रेखीव बांध्याच्या, कोणाच्याही डोळ्यात भरतील अशा पोरी तिच्याजवळ असायच्या. पण आलेल्या पोरी तिच्याजवळ फार दिवस टिकत नसत. माझी खात्री झाली होती, ती महामाया कुंटणखाना चालवीत असावी.

एक दिवस एका प्रवाशाचं ओझं घेऊन मी त्या चाळीत गेलो तर हृदयाला घरं पाडील असे दृश्य पहावयास मिळाले. एक लावण्यवती षोडशा त्या घरात दिसली. तिचा चेहरा अगदी कोमेजून गेला होता. तिने बऱ्याच दिवसात अन्नाला शिवलेले नसावे, असं तिच्या चेहऱ्यावरून वाटत होतं. ती महामाया तिला (धंद्याच्या दृष्टीने) चार गोष्टी सांगत होती. ती मात्र मख्खपणे सर्व ऐकून घेत होती. काहीच बोलत नव्हती. त्या मुलीच्या एकूण वागण्यावरून मला ती कुलीन घराण्यातील असावी असे वाटले. मला तिची कीव आली. या नरकातून तिला सोडवावे असे मन सारखे सांगत होते. पण मार्ग सुचत नव्हता. मी ३–४ दिवस सारखा याच गोष्टीचा विचार करत होतो. एक दिवस मला तिकडच्या भागाची हमाली करण्याचा प्रसंग आला. त्या दिवसाचे त्या महामायाचे हिडीस स्वरूप पाहून माझी तळपायाची आग मस्तकात गेली. ती तिला आता चौदावे रत्न दाखवून समजाविण्याचा प्रयत्न करीत होती. पण ती मुलगी तिच्या ध्येयापासून तिळभरही ढळली नसावी असे वाटत होते. माझ्याच्याने रहावेना. पण मार्ग मात्र सापडत नव्हता.

अखेर एक दिवस रात्री १२ वाजल्यानंतर मी त्या खोलीवर गिऱ्हाईक म्हणून गेलो. मालनने माझे चांगलेच स्वागत केले व तिच्यापुढील अडचण सांगितली. मी तिला तुझी अडचण दूर करतो असे सांगितले. त्या मुलीला तिच्या खोलीत पाठवावयास सांगितले.

"तू तिला असे बोललास?" मोतीराम सांगू लागला. ती मुलगी यावयास तयार नव्हतीच, धाकदडप दाखवून त्या मुलीस खोलीत लोटले. मी दार बंद करून घेतले. ती सारखी मुसमुसून रडतच होती. तिला तिचे रडू आवरत नव्हते. तिची त्या वेळची स्थिती पाहून एखाद्या रंडिबाजासही पाझर फुटल्याशिवाय राहिला नसता. मी तिचे सांत्वन करू लागलो. माझ्याकडे ती दयार्द्र नजरेने पाहू लागली. शिकाऱ्याच्या तावडीत सापडलेल्या हरिणीच्या नजरेप्रमाणे. मी तिला जवळ बसावयास सांगितले. ती जागची हलेना. मी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करू लागलो पण तिला भरोसा येईना. शेवटीं जेव्हा मी तिला "तू माझी बहीण आहेस" असे सांगितले तेव्हा ती संकोचून मजपासून हातभर अंतरावर उभी राहिली.

एवढ्या वेळपर्यंत एक वाजून गेला होता. सारीकडे सामसूम झाली होती. शेजारच्या खोलीतील कामकाज आटोपून तेथेल लाईट विझविले गेले होते. मग मी तिला विश्वासात घेऊन तिची हकीगत विचारली.

बऱ्याच दिवसात इतक्या आस्थेने विचारपूस करणारा तिला मिळाला नव्हता. तिला थोडे हायसे वाटले. तिने आपण बऱ्याच दूरच्या गावचे असल्याचे सांगितले. आपले आईबाप शेती काम करीत असून जवळच्या शहरात बाजारात आले असता एका पठाणाने भुरळ घालून येथे आणून सोडल्याचे सांगितले. तिची ती हकीगत ऐकून तशा परिस्थितीतही माझे अंग शहारल्यावाचून राहिले नाही.

असा वेळ घालविण्यात अर्थ नव्हता. तिला मी तुझे शीलभंग करण्यासाठी आलो नसून या नरकातून तुझी सुटका करण्यासाठी आलो असे सांगितले. भाऊ, अजूनही विस्फारल्या नजरेने जेव्हा तिने मजकडे बघितले ते दृश्य डोळ्यासमोर उभे राहते.

त्या नंतर आम्ही हळूच दार उघडून त्या चाळीच्या बाहेर पडलो. त्या म्हातारडीला कसा सुगावा लागला कोणास ठाऊक? तिने चोर चोर म्हणून ओरडण्यास सुरूवात केली. या वेळेपर्यंत आम्ही बरेचसे लांब आलो होतो.

त्या मुलीला योग्य स्थळी पोहोचविल्यावर मला किती आनंद झाला म्हणून सांगू! त्या आनंदापुढे माझ्याबाबतीत उडविलेल्या वावड्यांचं मला काहीच वाटत नाही.

"मोतीराम! खरंच तू एखाद्या पुढाऱ्यालाही लाजविणारं कृत्य केलेस. वायफळ वल्गना करून वेळ निभावून नेणाऱ्या पुढाऱ्यापेक्षा जरी तू हमाल असलास तरी प्रत्यक्ष कृती करून त्या मुलीचा पुनर्जन्म घडवून आणलास. आणि क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे. याचे प्रत्यंतर आणून दिलंस." ○

सहा दिवसांच्या युद्धात अर्वाचिन इतिहासातील सर्वात नालायक लष्करी हुकुमशहा ठरलेल्या नासरने, युद्धबंदी होताच ११ लष्करी सेनानींचे 'कृष्णमेनन' केले! दूरचित्रवाणीवरील आपल्या भाषणात तो म्हणाला, "या पराभवाची जबाबदारी माझी आहे, यासाठी माझा राजीनामा देऊन एक सामान्य नागरिक म्हणून राहण्याचे मी यापुढे ठरवले आहे."

---

सोमवार ५ जून १९६७ या दिवशी मध्यपूर्वेत युद्धाची ठिणगी पडल्यापासून पुढील सहा दिवस, इस्रायल सेनेकडून अरबांची सर्व आघाड्यांवर ससेहोलपट उडत असताना, जगातल्या बड्या राष्ट्रांच्या राजधान्यात काय घडत होते, याचा कानोसा घेतला, तर काय आढळते ? अरबांना भरीला घालून इस्रायलविरुद्ध मध्यपूर्वेत वातावरण गढूळ करणाऱ्या अरबांच्या तथाकथित मित्रांपैकी मदतीला कोण आला ? हजारो अरब मारले गेले काय किंवा अनेक इस्रायली नागरिक बॉम्बहल्ल्यात खलास झाले काय, रशियाला वा अमेरिकेला त्याचे सोयरसुतक थोडेच होते! मध्यपूर्वेतली ही राष्ट्रे ही अखेर स्वतःच्या देशाच्या हितासाठी राबणारी प्यादी आहेत, असेच बडी राष्ट्रे मानीत आलेली आढळतात.

५ जूनला पहाटे ४।। वा. अध्यक्ष जॉन्सन यांना झोपेतून उठवून इस्रायलने अरबांवर हल्ला चढवल्याची बातमी सांगितली गेली. जॉन्सन साहेबांना धक्का वगैरे काहीही बसला नाही. त्यांना हेच अपेक्षित होते. जर युद्ध पेटलेच तर इस्रायल, सर्व

। लेखांक सातवा




अरब एकजुटीने तुटून पडले, तरी त्यांचा मुकाबला करू शकेल याची खात्री त्यांनी लष्करी सल्लागारामार्फत करून घेतली होती. इस्रायलला आपला प्रश्न शस्त्रबळाने सोडवायला अमेरिकेची फूस आहे हे कोसिजीनचे आरोपपत्र अगदीच खोटे नव्हते. परंतु रशियाचा शस्त्रबळावर प्रश्न सोडवायला तात्त्विक विरोध आहे म्हणून कोसिजीन साहेबाला असे वाटत असते तर गोष्ट निराळी होती ! आताच युद्ध झाले तर अरबच मार खातील व पाश्चात्य राष्ट्रांना अधिक जवळ असलेले इस्रायलच अधिक प्रबळ होईल, या भीतीपोटी कोसिजीनसाहेबांचा हा कळवळा निर्माण झालेला होता.

जॉन्सन साहेबाला भीती एकच होती की अरब–इस्रायल युद्धात रशिया पडला तर जागतिक युद्धाचा भडका उडायला वेळ लागणार नाही. हे टळावे यासाठी, या प्रकरणात अमेरिका तटस्थ राहील हाच २३ मेला जॉन्सन यांनी केलेल्या निवेदनाचा सूर होता. आता प्रत्यक्ष संघर्ष सुरू झाल्यावर क्रेमलिन काय करते हे जाणण्यास फक्त जॉन्सन साहेबच अधीर होते.

एखाद्या मोठ्या युद्ध खाईच्या जबडयात, परस्पर गैरसमजाने जग सापडू नये, त्यासाठी वॉशिंग्टन–मॉस्को ही खास संदेश व्यवस्था (Hot–Line) क्युबाच्या प्रकरणानंतर सुरू करण्यात आली होती. ही संदेश व्यवस्था युद्ध सुरू झाल्यापासून म्हणजे ३० ऑगस्ट १९६३ पासून ५ जून ६७ या घटकेपर्यंत उपयोगात आणण्याचा प्रसंगच आलेला नव्हता. पहाटेच उठून जॉन्सनसाहेब कोसिजीनच्या संदेशाचीच मार्गप्रतिक्षा करीत बसले होते. काही वेळातच ही 'हॉट–लाईन' सुरू झाली. कोसिजीनचा संदेश जॉन्सन यांना मिळाला. उत्तर गेले. दोघांनी अरब इस्रायल संघर्ष ताबडतोब बंद करावा म्हणून सुरक्षा–समितीला आवाहन करायचे ठरवले.

६ जून १९६७ ला १०॥ वा. सुरक्षा–समितीच्या १५ सभासद राष्ट्रांची बैठक सुरू झाली. या वेळी सुरक्षा–समितीचे अध्यक्षपद डेन्मार्कच्या तबोर या सभासदाकडे होते. अमेरिकेचे प्रतिनिधी गोल्डबर्ग व रशियाचे प्रतिनिधी फेडेरेन्को यांनी तयार केलेला ठराव सुरक्षा समितीपुढे ठेवण्यात आला. सगळा ७ मिनिटांचा मामला ठरला. ठराव एकमताने पसार झाला –

–"ताबडतोब दोन्ही बाजूंनी लढाई बंद करावी !"

त्याच दिवशी रात्री ८ वा. अध्यक्ष जॉन्सन अचानक टेलिव्हिजनवर भाषण करताना लोकांना आढळले –

"अमेरिकेचा सुरक्षा समितीच्या ठरावाला संपूर्ण पाठिंबा आहे. आम्हाला आशा आहे की संबंधित पक्ष हा ठराव ताबडतोब कार्यवाहीत आणतील. आमचा असा विश्वास आहे, की मध्यपूर्वेच्या लोकांना कायम शांतता व प्रगतीसाठी पहिले पाऊल म्हणून प्रथम त्यांनी युद्धबंदी केली पाहिजे."

जुनीच भाषा जुनीच रेकॉर्ड !

इस्रायलला युद्धबंदी पत्करण्यासाठी मुळीच घाई नव्हती. तिकडे नासरच्या गळ्याभोवती फास आवळत चाललेला होता. इस्रायलचे परराष्ट्र मंत्री अबा इबन न्यूयॉर्कला काही तासांपूर्वीच दाखल झाले होते. एशकॉलला सतत पाठिंबा देऊन इस्रायली जनतेला सबुरीचा सतत सल्ला दिल्याने काहीशा अप्रिय झालेल्या या परराष्ट्र मंत्र्यालाच, या वेळी जगाच्या व्यासपीठावर इस्रायलचा शस्त्राचारच कसा समर्थनीय आहे, हे सांगण्याची पाळी आलेली होती.

संयुक्त राष्ट्रांच्या पुढे बोलताना इबन यांनी आपल्या देशाची बाजू सुंदर मांडली. ते युद्धपूर्व परिस्थितीची जाणीव करून देताना म्हणाले –

"अकाबाचे आखात हे आमच्या देशाचे एकच फुप्फुस होते. यावर नासरने आघात केला. त्यांचे ८०,००० सैन्य ९०० रणगाडयांसह सिनायमध्ये दाखल झालेले होते. चोहोबाजूंनी इस्रायल घेरून टाकण्यात अरबांनी यश मिळवले होते. आमच्या जीवन मरणाचा प्रश्न हा आम्हीच सोडवायला पाहिजे अशी जेव्हा आमची खात्री पटली, तेव्हाच आम्ही संघर्ष सुरू केला."

" आठवडाभर आम्ही वाट पहात होतो. जगातली आरमारी प्रबळ सत्ता, अकाबाची कोंडी उठवून आमच्यावरचे प्राणसंकट टाळतील अशी आशा आम्हाला होती. कुणी काहीही केले नाही ! "

इबन याने इंग्लंड–अमेरिकेला हाणलेला हा जोडा होता. ऊ थांटचा समाचार घेताना इबन याने पुढे म्हटले–

" आमच्या देशातले आणि देशोदेशींचे लोक विचारीत आहेत – उपयोग काय या संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेचा ? ही संघटना म्हणजे अशी एक छत्री दिसते की पाऊस सुरू होताच ती काढून घेण्यात येते ! ! "

अखेर युद्धबंदीसाठी आपल्या अटी त्याने जाहीर केल्या–

" आम्हाला या वेळी जेत्यांना लाभणारी शांतता हवी आहे. (१) आमच्या राष्ट्राचे अस्तित्व मान्य करून, आमच्या समूळ नाशाच्या कल्पना अरब राष्ट्रांनी डोक्यातून कायमच्या काढून टाकाव्या. (२) आमच्या शेजारी राष्ट्रांनी मध्यपूर्वेच्या राजकारणातील आमचे अस्तित्व गृहीत धरण्याइतपत बुद्धिवादी दृष्टिकोन यापुढे स्विकारला पाहिजे व (३) सर्व मांडणे शांततेच्या मार्गाने मिटविण्याची हमी आम्हाला मिळाली पाहिजे."

भाषणाची अखेर इबन याने एखाद्या तत्त्वज्ञाच्या भाषेत केली–

" माझी खात्री आहे की माणसे काय किंवा राष्ट्रे काय, ही बाकी सर्व मार्ग खुंटले की अखेर शहाणपणाने वागू लागतातच – हे जे घडले त्याने कुणाचा फायदा झाला आहे ? "

इबन याने फड जिंकला होता. इबनला उत्तर द्यायला सिरियाचा प्रतिनिधी जॉर्ज तोम्हे उभा राहिला. त्याने भाषणात, अमेरिकेने व इंग्लंडने इस्रायलच्या वतीने बॉम्बफेक केल्याच्या आरोपाचा पुनरुच्चार करताच, अमेरिकेचा प्रतिनिधी गोल्डबर्ग ओरडून हासडला–

" Put up or shut up – बाप दाखवा नाहीतर श्राद्ध करा – हे खोटं आहे ! "

पाठोपाठ इराकच्या प्रतिनिधीने सांगितले, " हा युद्धबंदी ठराव म्हणजे इस्रायलपुढे लोटांगण आहे. "

मंगळवारी रात्री चर्चा अर्धवट राहून बैठक संपली, तेव्हा अरब देश युद्धबंदी स्विकारण्याच्या मानसिक अवस्थेत नाहीत असाच सर्वांचा समज झाला होता.

बुधवारी ७ जूनला तिकडे युद्ध चालूच होते. इस्रायली सैन्य अरबांचा अक्षरशः धुव्वा उडवीत सुटलेले होते. न पचलेली रशियन लष्करी साहित्याची मदत, इस्रायल सेनेच्या हातीच पडत चालली होती. आता युद्धबंदीची घाई कुणाला अपेक्षित होती तर ती रशियाचा प्रतिनिधी फेडेरेन्कोला आणि त्याच्या अरब अशीलांना !

अरब प्रतिनिधी फेडेरेन्कोकडे हट्ट धरून होते, की जिंकलेल्या प्रदेशातून इस्रा-

यली सैन्य मागे घेण्यात यईल या अटीवरच युद्धबंदी पत्करा. बुधवारी सकाळी फेडेरेन्कोने संयुक्त राष्ट्रांना सांगितले–

" मला मॉस्कोशी विचारविनिमय करायला वेळ हवा आहे... "

गोल्डबर्ग याने फेडेरेन्कोला आता जोखला होता. त्याने सांगितले–

" रशियन प्रतिनिधीने लागेल तेवढा वेळ अवश्य घ्यावा ! "

गोल्डबर्गचे आता काय जात होते ? तिकडे इस्रायली सैन्य परस्पर अरब सैन्याची आणि पर्यायाने रशियन लष्करी मदतीची अब्रू घेत होते. इजिप्त, अल्जिरिया, सुदान, सिरिया, इराक, येमेन या सर्वांनी अमेरिकेने बॉम्बफेक केल्याच्या वृत्तावर विसंबून, अमेरिकेशी राजनैतिक संबंध तोडल्याचे जाहीर केले होते. हकनाक अमेरिकेची सहानुभूती अरबांनी गमावलेली होती. 'अल–अहरम्' या कैरो येथील सरकारी वृत्तपत्राने बातमी दिली होती–

" जॉर्डनचे राजे हुसेन यांच्या घरावर अमेरिकन विमानांनी रॉकेटस्‌चा मारा केला– "

सगळा गोंधळ माजलेला होता. अरब देशांच्या आकाशवाणी केंद्रावरून अरबांनी प्रतिहल्ला सुरू केल्याच्या बातम्या देऊन, रशियन प्रतिनिधीला आशा लावली की आणखी काही काळ वेळ काढला तर कदाचित अरबांनाच जेत्याची शांतता पदरात पाडून घेता येईल.

परंतु अरबांच्या प्रखर प्रतिहल्ल्याच्या बातम्या या शुद्ध थापा होत्या. यामुळे अरब जनता फसलीच परंतु रशियन प्रतिनिधीही फसला.

गुरुवारी अमेरिकेने व रशियाने दोन निरनिराळे ठराव पुनश्च सुरक्षा समितीपुढे ठेवले. फेडेरेन्को याने मांडलेल्या ठरावात–युद्धबंदी ताबडतोब करून, जिंकलेल्या प्रदेशातून इस्रायलने मागे गेले पाहिजे ही अट होती. तर अमेरिकेच्या ठरावात, अरबांविरुद्धचा रोष अधिकच प्रकट झालेला होता. या ठरावात म्हटले होते की युद्धबंदी करून शांततेसाठी वाटाघाटी सुरू करण्यात याव्यात. याचा अर्थ युद्धपूर्व सरहद्दीच आम्ही मानू ही अमेरिकेची भूमिका बदलली होती. मध्यपूर्वेत इस्रायलला अनुकूल असा नवा नकाशा काढायला अमेरिकेची आडकाठी नव्हती.

अरब जगतात निकालात निघालेली प्रतिष्ठा परत मिळविण्याचा रशियन प्रतिनिधीचा प्रयत्न इतका सपशेल फसला की विचारून सोय नाही.

गोल्डबर्ग यांच्या भाषणानंतर इजिप्तचा प्रतिनिधी एल्‌कोनी बोलणार होता. त्याला तितक्यात कैरोहून फोन आला. कैरोहून इजिप्तच्या परराष्ट्र मंत्र्याने एल्‌कोनी याला सांगितले–

" युद्धबंदी स्वीकारा ! "

एल्‌कोनी परत आला व त्याने एक चिठ्ठी लिहून ती ऊ थांटच्या मागे बसलेल्या राल्फ बूंच यांचेकडे सरकवली. बूंच याने ती वाचली व तडकाफडकी तो

उठून ऊ थांटपाशी गेला. ऊ थांट यांनी ती चिठ्ठी सुरक्षासमितीचे अध्यक्ष तबोर यांना दाखवली.

तबोर याने गोल्डवर्गचे भाषण बंद करून, समितीला सांगितले की यानंतर एलकोनी यांना बोलण्याची आवश्यकताच नाही. यानंतर ऊ थांट महत्त्वाचे निवेदन करतील. ऊ थांट यांनी गंभीर आवाजात एलकोनी यांचे निवेदन वाचून दाखवले.

"आमच्या सरकारच्या सूचना मिळाल्याप्रमाणे मी आपणास हे सांगू इच्छितो की आमच्या सरकारने ६ जूनच्या सुरक्षा समितीच्या ठरावाप्रमाणे युद्धबंदी पत्करली आहे."

ऊ थांटचे निवेदन पुरे होताच सर्वांच्या नजरा एलकोनी व फेडेरेन्को यांच्या चेहऱ्याकडे वळल्या. एल्कोनी यांचा चेहरा पिरॅमिडसारखा दु:खीकष्टी परंतु थंड होता. फेडेरेन्कोचा चेहरा केळ्यावरून पाय घसरून पडलेल्या माणसासारखा दिसत होता. आदल्या दिवसापर्यंत इस्रायल सैन्य मागे घ्यावे, या अटीसाठी हटून बसलेल्या इजिप्तने रशियाला न विचारता–पुसता, एकदम शरणागती देऊन रशियाची मोठीच पंचाईत केली होती.

मध्यपूर्वेतील सिनाय व जॉर्डनमधले युद्ध संपले होते. सिरियाने दमास्कस धोक्यात येताच पूर्वी सांगितल्याप्रमाणे दोन दिवसांनी शरणागती दिली व संयुक्त राष्ट्रांच्या फाटक्या पदराचा आडोसा घेतला.

मध्यपूर्वेत संहार व सुरक्षा समितीत युद्धबंदीवरचे चर्चासत्र झडत असताना जगातल्या इतर काही राजधान्यातून काय घडत होते हेदेखील पाहण्यासारखे आहे.

पॅरीसमध्ये अध्यक्ष द गॉल यांनी सक्त तटस्थ भूमिका घेतली. असे प्रश्न–जगातली वडी राष्ट्रेच सोडवू शकतील म्हणून बड्या चार राष्ट्रांची परिषद द गॉल यांनी सुचविली. हे चार बडे म्हणजे अर्थात–इंग्लंड, अमेरिका फ्रान्स व रशिया. रशियाने ही सूचना फेटाळली. कारण या परिषदेत एक रशिया वगळता बाकी तिघे इस्रायलचेच सिद्धसाधक असणार, ही रशियाची भीती रास्तच होती. मात्र पॅरीसमध्ये हजारो फ्रेंच लोकांनी मिरवणूका काढून इस्रायलला पाठिंबा जाहीर केला. फ्रेंच कम्युनिस्ट पार्टी ही जगातल्या इतर कम्युनिस्ट पक्षाप्रमाणे क्रेमलीनचीच सून असल्याने, त्यांनी इस्रायलचा कडक निषेध केला. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे, व्हिएटनाम युद्धात अमेरिकेवर कडाडून हल्ला चढवणारा प्रख्यात फ्रेंच लेखक जीन पॉल साज, याने मात्र इस्रायलची भूमिका योग्य असल्याचा निर्वाळा दिला.

इंग्लंडने इस्रायलच्या वतीने जॉर्डनमध्ये बॉम्बफेक केल्याचे वृत्त, नासरने व राजे हुसेन यांनी प्रसिद्ध करताच, इंग्लंडमधले लोकमत खवळले. पंतप्रधान विल्सन यांनी या आरोपाचा खरपूस समाचार घेतला. हाईड पार्क येथून दोन मैलांचा प्रचंड मोर्चा निघून इस्रायली वकिलातीपुढे जाऊन त्यांनी इस्रायलला आपला नैतिक पाठिंबा उघडपणे व्यक्त केला. ब्रिटिश झिओनिस्ट फेडरेशनने मदतीची हाक देताच

९७,५०,००० पौंड एवढी रक्कम इस्रायलला मदत म्हणून तात्काळ जमा झाली.

पंडित नेहरूंकडून नासरप्रेमाचा वडिलोपार्जित वारसा असलेल्या इंदिरा सरकारची प्रतिक्रिया, ही परकीय निरिक्षकांना कशी दिसली ? दिल्लीची प्रतिक्रिया सांगताना अमेरिकेतील एका वृत्तपत्राने लिहिले–

" Prime Minister Indira Gandhi, heavily dependent on American food shipments to keep Indians alive and herself in office called Nasser as force of progress. "

[भारतीय नागरिकांना जिवंत ठेवण्यासाठी आणि स्वतःची खुर्ची सांभाळण्यासाठी, अमेरिकेतून समुद्रमार्गे येणाऱ्या धान्य मदतीवर अवलंबून असलेल्या भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी नासरचा प्रगतिशील शक्ती असा गौरव केला. ]

हे वाचून आपल्याला वाईट वाटणे साहजिकच आहे. कारण यात इंदिरा सरकारच्या वर्मावरच बोट ठेवलेले आहे. परंतु या पाश्चात्य पत्रकारांना हे समजत नाही, की अमेरिकन मदतीमुळे आम्ही त्यांचे लाचार झालेलो नाही, हे जगाला सांगण्याचा याहून दुसरा चांगला उपायच सापडत नसला तर पंतप्रधानांनी तरी काय करावे ? " Lady protests too much " असे इतरांनी खुशाल म्हणावे. शिवाय असे पहा की ' युनेफ ' दलात काम करणारे ११ हिंदी जवान, इस्रायलकडून पहिल्याच दिवशी चकमकीत मारले गेल्याची बातमी भारतात आलेली असल्यामुळे, अरब-प्रेमापोटी पत्करलेल्या इस्रायल द्वेषाला उधाण आल्याशिवाय राहील काय ? पुढे चौकशीअंती अरबांनी पेरलेल्या सुरुंगांनीच या ११ जवानांचा बळी घेतला असे प्रसिद्ध झाले. ही–गोष्ट निराळी !!

या सर्व रणदुंदुभी नाटकाचा शेवटचा विनोदी प्रवेश नासरशहानेच झक्क वठवला ! सहा दिवसांच्या युद्धात अर्वाचीन इतिहासातील सर्वात नालायक लष्करी हुकूमशहा ठरलेल्या नासरने, पराभवाचा वास लागताच आपली वैयक्तिक नाचक्की टळावी म्हणून काय करायचे याचा धूर्त आराखडा रचला. युद्धबंदी होताच त्याने ११ सर्वोच्च लष्करी सेनानींचे ' कृष्णमेनन ' केले ! यातच फिल्डमार्शल अहंमद अब्दुल हकीम अमेर हा देखील होता. जणू काय पराभवाला हेच लोक फक्त जबाबदार होते ! मग आपल्या लोकप्रियतेवर उदंड भरवसा ठेवून त्याने अश्रूपूर्ण नेत्रांनी दूरचित्रवाणीसमोर भाषण करताना सांगितले. " अरब प्रजासत्ताकाच्या या झालेल्या पराभवाची संपूर्ण जबाबदारी माझी आहे. मी यासाठी अध्यक्षपदाचा राजीनामा दिलेला आहे व सामान्य नागरिक म्हणून मी यापुढे राहण्याचे ठरवले आहे. " नासरची ती अश्रूपूर्ण आकृती पहाताच सद्गद्गलेल्या कैरो नागरिकांनी, हंबरडे फोडले ! हजारो संख्येने अरब कैरोच्या रस्त्यातून नासर प्रेमाने धाय मोकलीत त्याची करुणा भाकू लागले–

" नका हो नका ! आम्हाला असे वाऱ्यावर सोडून तुम्ही जाऊ नका ! "

नासरला वाटले होते इतिहासाची कदाचित पुनरावृत्ती होईल. मार खाल्लेले सैन्य जेव्हा कैरोत परतेल, तेव्हा कदाचित १९४८ साली घडले ते पुनःही घडेल. तेव्हा झालेल्या भीषण पराभवातूनच फरूक जाऊन नासर सत्तेवर आला होता; तसेच काही होईल व फरूकच्या मौतीने, आपणही मोजले जाऊ. या भीतीपोटी त्याने राजीनामा फेकला होता.

पण नासरच्या मंत्रिमंडळाने जनतेचे नासरवरील प्रेम पाहून, त्याचा राजीनामा स्वीकारण्यास नकार दिला. इतर अरब देशातून तारा आल्या. " नासर तुम्ही नेतृत्व सोडू नका ! " नासरने ओळखले की आपल्याविरुद्ध अपेक्षित असंतोषाचा मागमूसदेखील नाही. त्याने अरब-जगतावर उपकार करण्याच्या अविर्भावात राजीनामा परत घेतला.

जॉर्डनचा हुसेन हा देखील हादरला होता. पराभवामुळे त्याच्या देशाची अर्थव्यवस्था ढासळली होती. त्यातच जुने जेरुसलेम, इस्रायलच्या कबजात गेल्याने, हजारो यात्रेकऱ्यांकडून मिळणाऱ्या कराचे उत्पन्नही आता संपले होते.

सिरियाचा अध्यक्ष अल अटासी व अल्जिअर्सचा अध्यक्ष बुमेदिन यांच्या नांग्या ठेचल्या गेल्या असल्या तरी वीष मात्र अजून उतरलेले नव्हते. म्हणूनच पराभवानंतर मॉस्कोवारी पहिल्याने कुणी केली असेल तर ती बुमेदीनने केली.

सौदी अरेबियाच्या राजा फैसलने रागरंग पाहून, इस्रायलशी प्रत्यक्ष युद्ध केलेच नव्हते ! त्याचीही आतडी इस्रायल द्वेषाने बिघडलेली असली तरी तूर्त कातडी बचावलेली होती.

युद्ध हे एखाद्या विवाहबाह्य संबंधासारखे असते. प्रथम खूप बडबड व मनधरणी असते, मग काहीतरी सर्वस्व पणाला लागल्यासारखे बेभानपणाने घडते आणि मग लांबलचक स्पष्टीकरणे आणि निरवानिरव चालते.

१९६७ चे अरब-इस्रायल युद्ध असेच संपले आहे. वर्ष उलटले तरी इस्रायली सेना जिंकलेल्या प्रदेशातच घट्ट पाय रोवून उभी आहे. संयुक्त राष्ट्रांचे प्रतिनिधी डॉ. गुन्नार जारिंग यांच्या कैरो, तेल ॲव्हिव्ह, दमास्कस, न्यूयॉर्क वाऱ्या सुरू आहेत. या वेळी १९५६ प्रमाणे संयुक्त राष्ट्रांवर विसंबून इस्रायल सैन्य मागे घेईल हे संभवत नाही. नवा नकाशा इस्रायलला हवा आहे. १२ जून १९६७ लाच पंतप्रधान एशकॉल यांनी आपली भूमिका मांडलेली आहे.

" आठवड्यापूर्वी जी स्थिती होती तीच परिस्थिती इस्रायल पुनः स्वीकारील, या भ्रमात यावेळी कुणी राहू नये. आमच्या अस्तित्वासाठी आणि सुरक्षिततेसाठी आम्ही एकटे लढलो आहोत. आमच्या देशाचे हित—अहित कशात आहे हे ठरविण्याचा आणि त्याप्रमाणे वागण्याचा अधिकार आमचा आहे. "

# स मा प्त

५ ऑक्टोबर १९६८

# मा णू स

हे बघा आमचं घर! अगदी चंद्रमौळी. शेजारच्या पाठककाकू म्हणतात हे सुदाम्याचं घर आहे म्हणून. असा राग येतो मला त्यांचा, पण त्यांचा स्वभाव फार फटकळ आहे. याच घरात एका वेळी ४०–५० गायी म्हशी डुलत असतील अन् तीसपस्तीस माणसं रहात असतील असं वाटणार नाही तुम्हाला. अहो, माझा जन्म इथलाच पण मलाही कधीकधी खरं वाटत नाही. सध्या आम्ही तीघंच राहतो या घरात, माझे वडील, आई अन् मी. पूर्वी फार मोठा दरवाजा होता या घराला, किल्ल्यासारखा. त्याचे अवशेष आठवतात मला. त्या ठिकाणी आता एक छोटा दरवाजा आहे. मी फार थोडं पाहिलं या घराचं वैभव. ते सुंदर देवघर आठवलं की मन हुरहुरतं. मग ज्यांनी या घराचं पूर्ण वैभव पाहिलं असेल त्यांना–माझ्या वडिलांना–काय वाटत असेल? चुकली कल्पना तुमची. असे भावनात्मक विचार करून ते कधीही विषण्ण होत नाहीत, प्रसंगी ते हुरळूनही जात नाहीत. त्यांनी या घराचं पूर्ण वैभव पाहिलं आहे. त्यांनीच हा छोटासा दरवाजा बसविला आहे. त्यांचा स्थायीभाव आहे " होतं ते बऱ्याकरिताच. "

तर आमचं घर म्हणजे मुख्य रस्त्याला लागून एक बोळ आहे त्यात आहे. समोर छोटासा दरवाजा, उजव्या हाताला बैठक. उन्हाळ्यात बरंच उन, पावसाळ्यात बराच पाऊस अन् एरवी रात्री रस्त्यावरच्या दिव्याचा प्रकाश आत येत असतो.

सकाळी सात-साडेसातपासून आमच्या घरी लोकांची वर्दळ सुरू होते.

**अरुण पनजकर**

" नानाजी आहेत का ?"

" नानासाब क्या करते हैं ?"

" नाना, अहो नाना..." यातली बरीच माणसं माहीत आहेत मला. मी जर समोर असलो तर या लोकांना कटवतो. पण नानांच्या लक्षात आलं तर मात्र मला बोलणी बसतात.

आज नानांचं वय सत्तर वर्षांच्या वर आहे. पण कुणी म्हणणार नाही. उंच, गोरी, सुदृढ, चेहरा करारी पण सात्त्विक मुद्रा असलेली त्यांची आकृती पाहिली की कुणालाही आदरच वाटतो त्यांच्याबद्दल. अजूनही नाना लाकडं घरी फोडतात. अन् त्यांचा एक दातसुद्धा अजून पडलेला नाही. त्यांचं नेहमीचं हास्य अन् विनोद यामुळे लोकांना त्यांच्याविषयी विशेषच आदर आहे.

आमचं गाव बरंच मोठं आहे. बावन्न पुरे आहेत. नानांना बावन्नही पुऱ्यांची पूर्ण माहिती आहे. कुठं काय झालं. केव्हा झालं वगैरे मनोरंजक माहिती ते एखादे वेळी सांगतात. हाँजी-हाँजीपणा किंवा लांगूलचालन त्यांच्याकडून कधीही झालं नाही म्हणून त्यांना अनेक नोकऱ्या सोडाव्या लागल्या. मात्र त्याकरिता ते निराश कधीच झाले नाहीत. ' जे होतं ते बऱ्याकरिताच ' म्हणून पुढचा व्यवहार.–तर या बावन्नही पुऱ्यांतून त्यांच्याकडे माणसे येतात. कुंभार, महार, चांभार, भाजीवाल्यांपासून तो बनीया, वकिलापर्यंत. कुणी सल्ला विचारायला तर कुणी अर्ज लिहून घ्यायला. कधीकधी बराच वेळपर्यंत बसतात हे लोक. नानांचं डोकं दुखवतात. त्यांचं जेवण वगैरे झालं किंवा नाही याची पर्वा न करता बराच वेळ घेतात. अन् म्हणून या लोकांना मी टहेलविण्याचा प्रयत्न करतो. बरं, या लोकांपासून नानांना प्राप्ती म्हणाल तर काहीच नाही. बऱ्याच वेळा मी कुरकुरतो " हे सगळे फुकटे लोक आहेत ना ? का करता उगीच त्यांची कामं ?"

नाना म्हणतात, " अरे, नाही तरी मला काय काम आहे आता ? न देईनात का ते काही. त्यांची कामं इथं होतात एवढा तरी विश्वास आहे ना त्यांना. घरच्यासारखे ते इथं येतात ना, बस ! एवढंच पाहिजे आहे मला." येणारे बरेच लोक केवळ तोंडदेखलं बोलतात हे मला माहीत आहे अन् नानांनाही. पण - तरीही नाना त्यांची कामं विनासायास करतात.

एक दिवस संध्याकाळची वेळ होती. अंधार झाला होता. भिंतीला टेकून नाना ओसरीवर बसले होते. काहीतरी खोल विचारात असावेत. असे ते कधी बसत नसत. विचारण्याची हिम्मत झाली नाही मला. कसेतरी चार घास खाऊन मी अंथरुणावर पडलो. नाना रात्री बराच वेळपर्यंत बसले होते. कारण कळलं तेव्हा मात्र थोडं आश्चर्य वाटलं. त्या रात्री त्यांनी त्यांचा ' माणूस ' साकार केला होता.

येणाऱ्या निवडणुकीमध्ये उभे राहायचा त्यांनी निर्णय घेतला होता. निवडणूक हा गरिबांचा खेळ नाही हे त्यांना माहीत होतं. निवडणुकीमधे खर्चायला पैसा

नव्हताच. निवडणूक झाल्यावर पैसा येणारही नव्हता. तरीही निःस्वार्थ बुद्धीने त्यांनी हा निर्णय घेतला. ते कुणाच्या पार्टीमध्ये नव्हते. स्वतंत्र म्हणून उभे राहिले. आम्ही राहतो तो नववा वार्ड, इथे नाना निश्चित निवडून येणार, पण तरीही नाना उभे राहिले पहिल्या वार्डातून. हा आमच्या घरापासून फार दूर आहे. कुणी त्यांना विचारलं, " नानाजी, तुम्ही हा वार्ड सोडून नंबर एक मध्ये का उभे राहिलेत ?" तर ते हसून म्हणायचे..."मी नंबर एकपासून सुरुवात केली आहे. इथेही येईनच."

स्वतंत्र उमेदवारांची चिन्हं कशी असतात, हे माहीत आहेच तुम्हाला. कुणाचा हत्ती, कुणाचा डरकाळी फोडणारा वाघ तर कुणाचा आरवता कोंबडा. नानांना यापैकी काहीही नको होतं. सांगितलं ना त्यांनी त्यांचा ' माणूस ' साकार केला म्हणून. त्यांनी त्यांच्या पेटीची निशाणी ठेवली ' माणूस. ' त्यांचा माणूस अगदी साधा होता. पायात जोडा, धोतर, अंगात अर्ध्या बाह्यांचा सदरा, डोक्यावर टोपी अन् हासरी मुद्रा.

निवडणुकांचे दिवस जसजसे जवळ आले, तसतसे वातावरण तंग होऊ लागले. जोरजोरांनी लाऊड स्पीकर्स, मोठमोठ्या सभा धुमधडाक्यांनी सुरू झाल्या. आमच्याकडे मात्र नित्याच्या पक्षकारांचीच धूम. नानांना संध्याकाळी काय तो थोडा वेळ मिळे. त्या वेळी ते नंबर एकमध्ये फिरायला जात. एकटेच. झोपडपट्टीपासून सर्वांना भेटत. त्यांचं स्वागत मात्र चांगलं होत असे. नाना म्हणायचे, " मला वाटलं त्यापेक्षा बरेच लोक मदत करताहेत मला. "

एक दिवस मी वॉर्ड नंबर एकमध्ये सहज गेलो. बऱ्याच ठिकाणी सुवाच्य हस्ताक्षरात कोळशांनी लिहिलं होतं, " माणसाला मते द्या. " नानांचंच अक्षर होतं ते. कोळशानं आणि खडूनं लिहिलेली ती अक्षरं पाहून अगदी भडभडून आलं मला स्वतःचा इतका साधा प्रचार कुणी करील का ? मला वाटले, एक लाऊड स्पीकर घ्यावा अन् ओरडत सुटावं, माणूस असाल तर माणसालाच मते द्या. पण फक्त वाटलंच, काही करू शकलो नाही. नऊ–दहा वर्षांचा असेन मी त्या वेळी.

नंतर निवडणुकीचा निकाल लागला. नानांना काही मतं पडली. डिपॉझिट गेलं मात्र. मला फार राग आला लोकांचा. पण नानांचं मत होतं, होतं ते बऱ्याकरिताच. अजूनही आमच्या घरी सर्व लोक येत आहेत, त्यांची कामं सहज होत आहेत. नाना सुखदुःखांना समान आहेत. तुम्ही या एकदा इथे, खरोखर तुम्हाला जाणवेल दिव्यत्वाची येथ प्रतिती...... O

# पुस्तके

मराठी कथाक्षेत्रामध्ये अपेक्षेने उच्चारल्या जाणाऱ्या काही नावांपैकी प्रा. चंद्रकांत वर्तक हे एक नाव बनू लागलेले आहे. हे मराठी कथेचे क्षेत्र वर्तुळाकार आहे अशी कल्पना केली आणि श्रेष्ठ कथालेखक केंद्रबिंदूपाशी ठेवून त्या क्रमाने परिघापर्यंत दृष्टी फिरवली, तर सीमेअल्याडच्या प्रदेशातली जी काही माणसे आपल्या उंचीमुळे चटकन नजरेत भरतात त्यापैकी वर्तक हे एक आहेत. केंद्राच्या आसपास येण्यासाठी अजून त्यांना खूप प्रवास करावयाचा आहे; पण ते जिथे आहेत, तिथे त्यांची उंची भरपूर आहे. ती इतकी लक्षात येण्यासारखी

## चंद्रकांत वर्तकांचे दोन कथासंग्रह

आहे, की तिथून त्यांना केंद्रालगतचा प्रदेश नजरेच्या टप्प्यात दिसत असावयास हरकत नाही.

ही रूपकाची भाषा बाजूला ठेवून मी असे म्हणेन, की 'पारंब्या' आणि 'फुलपंखी दिवस' या दोन कथासंग्रहांवरून प्रा. वर्तकांनी कथाक्षेत्रात काय केलेले आहे, आणि ते काय करू शकतील याचे सुस्पष्ट चित्र रेखाटता येते. हे दोन कथासंग्रह वाचून आपल्या डोळ्यापुढे लेखकाचे जे व्यक्तित्व उभे राहते ते पराकाष्ठेचे संवेदनाशील आहे. ते हळवे अथवा भावविवश नसले, तरी अनुभूतींना गडद स्वरूपात न्याहाळण्याची, क्वचित

**पारंब्या**

**फुलपंखी दिवस**

जरुरीपेक्षा जास्त गडद स्वरूपात न्याहाळण्याची त्याला सवय आहे. अनुभूतीच्या रंगयोजनेत नाजूक रंगछटांचा ताजेपणा राखण्याऐवजी, सारी अनुभूती एकाच गडद रंगाने रंगवून ( सारवून ? ) त्या गडदपणाची तीव्रता कमीजास्त करीत सारी जाणीव त्याने भरून टाकण्याचे त्यांना वेड आहे. वर्तकांच्या कथांत भावगर्भता हिंदोळते आहे. त्यांच्या कथांतली पात्रे भावनांनी तुडुंब भरलेली आहेत. मन भारून टाकणारे वातावरण निर्माण करण्याचे सामर्थ्य वर्तकांच्या लेखणीत खचित आहे. पण या सगळ्यात एकसुरीपणा आहे. खाचाखोचा नाहीत. चढउतार नाही. गडद रंगाने एखादी सरळ रेघ मारावी तशी वर्तकांची कथा विकासत जाते. ही रेघ कमीजास्त जाड होते. म्हणजे कथेची तीव्रता कमीजास्त होते. पण कुठेच ती वळणे घेत नाही. तिला कंगोरे निर्माण होत नाहीत. अमेरिकेसारख्या दूरच्या देशात सहचारिणीच्या मृत्यूनंतर तिच्या स्मृतीत रंगलेला एकाकी विधुर, सेवानिवृत्त होताना आयुष्यभर केलेल्या पत्नीच्या उपेक्षेने खिन्न होणारे विद्वान प्राध्यापक, दुसऱ्यांदा विधवा झाल्यानंतर जीवनाचा स्मृतिपट उलगडून सुन्न मनाने बसलेली अभागिनी—यासारखी वर्तकांनी निर्माण केलेली कितीतरी भावचित्रे ही अशी सरळ रेघेने रेखाटलेली आहेत. त्यांच्या आयुष्यात व्यथा आहे, पण त्या व्यथेची कथा सांगताना वर्तकांनी त्या व्यथेचे एकमिती चित्रणच केलेले आहे. हे चित्रण चांगले आहे, समर्थ आहे, पण अपुरे आहे.

यावरून मग असे वाटायला लागते, की वर्तकांनी आपल्या प्रत्येक कथेला एकेक चाकोरी ठरवून दिलेली आहे. या चाकोरीत साठणारा अनुभवच ती ती कथा सांगते. अथांग आकाशाचा आपल्या खिडकीतून दिसणारा एखादा छोटासा निळा तुकडाच सारखे टक लावून पहात बसावे तसे या कथांमधून होते. सामान्य वाचकाच्या दैनंदिन अनुभूतीच्या क्षेत्राबाहेर उडी मारण्याचा प्रयत्न काही कथांमधून वर्तक करतातही. पण ही उडी म्हणजे पल्लेदार झेप ठरत नाही. तिथेही ते आधी आपल्या कक्षा रेखून घेतात आणि तेवढ्या कक्षेतच भावमयतेचे रंग भरत बसतात. ' ओढ ', 'पोकळी' आणि ' फुलपंखी दिवस ' या कथांमधून आलेली पाश्चात्य वातावरणाची पार्श्वभूमी हे अशा तऱ्हेच्या रूढ अनुभूतिक्षेत्राच्या बाहेरील उडीचे उदाहरण आहे. पण तेथेही त्या अनुभूतीच्या वेगळेपणाशी कथेतील भावमयता जेवढी संलग्न व्हायला पाहिजे होती, जेवढी एकरूप होणे जरूर होते, तेवढी ती झालेली नाही. आणि त्यामुळे पत्नीच्या आठवणीत रंगणारा विधुर व आयुष्यातील अपयशाचा राग बायकोवर काढणारा भडक भावनांचा तरुण असे त्यातल्या व्यक्तींचे सामान्यीकरण होते. पाश्चात्य वातावरण फक्त बॅक्ग्राउंडसारखे सुटे राहून, ही दिवंगत पत्नी मायदेशाशी कायमची ताटातूट झाल्याने आयुष्यात उदासीन झालेली होती, किंवा हा मत्सरी भडक भावनांचा तरुण नि त्याची पत्नी पाश्चात्य संस्कृतीतली असल्याने ती घटस्फोटाची भाषा सहजतेने बोलते, एवढेच त्या पार्श्वभूमीशी मुख्य कथेला

जोडणारे क्षीण दुवे ठरतात. त्यामुळे हे सगळे पूर्वीच निरनिराळ्या कथांतून येऊन गेलेले आहे, यात नवीन काही नाही असे वाटत राहते. ' फुलपंखी दिवस ' ही या अशा तऱ्हेच्या कथांमध्ये त्यातल्या त्यात यशस्वी असलेली आपल्या अनुभूतीच्या वेगळेपणाशी प्रामाणिक राहणारी अपवादात्मक कथा. त्यातल्या व्यक्तिरेखा निश्चित वेगळेपणाने रेखाटलेल्या, आणि म्हणून समर्थ वाटतात.

' मंतरलेली वाट ' ही एक हसतखेळत फुलणारी रम्य वातावरणाची गोष्ट आहे. पण तीही एका ठराविक मर्यादेत फुलते–विकासते. तिचे पदरपदर उमलत नाहीत. किंवा ' द्वंद्व ' या कथेमध्ये वर्णन केलेली मन:स्थिती म्हणजे खूप ताणली गेलेली मनाची तार आहे. तिचा ताण, तिचा हळुवारपणा नाजुकतेने हाताळायला भरपूर वाव आहे. तेथेही वर्तकांचे लेखन कौशल्याचे होते. पण ते भावनांचा गुंता शक्यतो टाळतात. सरळ धोपट एकसुरी चित्रण जास्त पसंत करतात. ही त्यांच्या लेखनाची मर्यादा. ' उतरण ' सारख्या कथेमध्ये हे फार जाणवते. या कथांमध्ये मन उमलून टाकणारी तीव्रता आहे. अस्वस्थ करणारी शक्ती आहे. पण ठराविकतेचे कुंपण त्यांच्याभोवती सतत उभे आहे. पंखात खूप शक्ती असेल असे वाटणाऱ्या पक्ष्याला छोट्या पिंजऱ्यात अडकवून ठेवावेतसे वाटते. थीम, कन्सेप्शन्स, इंटरप्रिटेशन्स–सगळे बोथट वाटते. गडद असले तरी.

' बळी ', ' नर ', ' अघांतर ' आणि ' अघटित ' या कथांमधून वर्तक या ठराविकतेच्या पिंजऱ्यातून बाहेर आलेले आहेत. याचे श्रेय त्या कथांतील नाट्याला द्यावे लागते. ' बळी ' या कथेची पार्श्वभूमी सवंगच आहे. पण त्यातले नाट्य चांगले रंगवले गेले आहे. चैतन्यमय ठरले आहे. ते परिस्थितीतून उद्भवलेले नाट्य आहे, तर ' अघांतर ' व ' अघटित ' या कथांमधले नाट्य व्यक्तींच्या स्वभाव धर्मातून अवतरलेले आहे. विनाकारण दुस्वास करणारे वैशिष्ट्यपूर्ण प्रा. मैराळ, विक्षिप्त आग्रह धरणारे खादीधारी प्राचार्य, दडपणामुळे विसंगतपणे वागणारी व शेवटी आत्महत्येचा प्रयत्न करणारी सुषमा – यासारख्या सगळ्या व्यक्तिरेखा स्वयंपूर्ण आहेत आणि त्यामुळेच त्यांच्या परस्पराघातातून चांगले नाट्य उभे राहिले आहे. हे नाट्य इतके प्रभावी आहे की त्या भरात ' अघांतर ' ही कथा निष्कारण लांबत गेली आहे हेही जाणवत नाही.

' तृष्णा ', ' स्वभाव ', ' निरोप ' व ' अभागिनी ' या माझ्या दृष्टीने याहीपेक्षा यशस्वी कथा. यांच्यापैकीसुद्धा ' स्वभाव ' या कथेतील नाट्याचे स्वरूप अगदी सामान्यच आहे; आणि ' अभागिनी ' या कथेतील विषय फार मोठा व्यापक असला तरी त्याची भेदकता लेखकाला पेललेली नाही. पण असे असूनसुद्धा या चार कथा म्हणजे वर्तकांच्या प्रवासातील यशाचा टप्पा आहे असे मला वाटते. कारण अभिव्यक्तीची सफाई आणि त्यातून अगदी सहजतेने व परिणामकारकतेने आशयाचे प्रकटीकरण या फार महत्त्वाच्या गोष्टी येथे साधलेल्या आहेत. या कथा आपोआप उमलतात.

हळुवारपणे हाताळल्या जातात आणि बाणाच्या टोकाप्रमाणे पटकन लक्ष्यभेद करून टाकतात. तिथे एकसुरीपणा जाणवत नाही. त्यांचे विषय जरी पूर्वपरिचित असले तरी त्यातील सूक्ष्मतेमध्ये एक प्रकारच्या नावीन्याचे झरे झुळझुळताना दिसतात. अगदी मोजक्या शब्दात जास्तीतजास्त नाट्य केंद्रित केले जाते. मनाचे पदर उलगडून दाखविले जातात. भावनांच्या नाजूक छटांचे दर्शन होते. एक वेगळेच वातावरण तयार होते.

सुरुवातीला मी म्हटल्याप्रमाणे प्रा. वर्तक हे मराठी कथाप्रांतात परिघसीमेपाशी उभे असले तरी केंद्रबिंदूपर्यंतचा त्यांचा प्रवास झपाट्याने होईल आशी आशा वरीलसारख्या काही कथांतून निश्चितपणे निर्माण होते. त्या दृष्टीनें या दोन कथासंग्रहांचे स्वागत करावयास हवे. ◻

**निशिकांत मिरजकर**

## ◻ सुबोधगीता

"गीताग्रंथ हा मूळ संस्कृत भाषेत असून त्याची देशी व परदेशी भाषात पुष्कळ भाषांतरे झाली आहेत. गीतेची गोडी अनुभवण्यास तो ग्रंथ मुळातून वाचला पाहिजे. पण पुष्कळांची संस्कृत भाषेची तितकी तयारी नसते. यामुळे भाषांतरे आवश्यक आहेत. मराठीत जी भाषांतरे झाली आहेत ती प्रायः प्रथम संस्कृत श्लोक व त्याखाली भाषांतर अशा पद्धतीची आहेत. पण अर्थ लावीत बसल्याने विषयावरील लक्ष तुटते व संदर्भ सुटतो. विषय समजण्यासाठी सरळ, साधे, स्वतंत्र छापलेले भाषान्तर असेल तर ते सोयीचे होईल, व त्याने मराठी जाणणारास गीतेच्या तत्वज्ञानाचा प्रसार होण्यास मदत होईल. अशा भावनेनें हे भाषान्तर लिहिण्याचा प्रयत्न केला आहे."

लेखकाने आपल्या प्रस्तावनेत या 'सुबोधगीता' लेखनाचे प्रयोजन असे सांगितले आहे. ज्ञानेश्वरी, लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य, महर्षि सातवळेकरांची पुरुषार्थ प्रबोधिनी व गीतेवरील उपलब्ध मराठी-इंग्रजी भाषान्तर या सर्वांचा अभ्यास करून कै. देशपांडे यांनी हे सुबोध भाषान्तर केले आहे. पुस्तकाचे चार भाग आहेत. पहिल्या भागात अठरा अध्यायांचा सारांश थोडक्यात अध्यायवार दिला आहे. दुसऱ्या भागात गीतेचे भाषान्तर दिले आहे. ते सुबोध शीर्षकांखाली गीतेतील विषय विभागून अतिशय सुगम केले आहे. तिसऱ्या भागात गीतेचा संदेश काय, अभ्यास कोणत्या वयात करावा व गीतेतील काही महत्त्वाच्या विषयांची, परमेश्वर, त्याची प्रकृति व माया, उपासनेचे मार्ग, समत्व इत्यादींची विशेष चर्चा केली आहे.

कै. शामराव विनायक देशपांडे यांच्या या सुंदर पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या निधनानंतर झाले असल्याने, लेखकाची चरित्रवजा माहिती त्यांचे चिरंजीव, प्राचीन मराठी काव्याचे चिकित्सक अभ्यासक, श्री. ज. शा. देशपांडे यांनी दिली आहे. पुस्तकाचा हा चौथा भाग वाचल्यानंतर हे चरित्र या पुस्तकाचाच अविभाज्य घटक आहे हे लक्षात येते. कै. देशपांडे यांचा जीवनपट वाचल्यानंतर त्यांच्या जीवनात कर्मयोग कशा तऱ्हेने बाणला होता याचे दर्शन घडते. या गीतोपासकाने गीतोपदेश प्रत्यक्ष जीवनात पचवलेला होता. डेप्युटी कलेक्टर या जागेवरून १९२६ मध्ये निवृत्त झाल्यानंतर कै. देशपांडे यांनी वडोदा संस्थानची नायब दिवाणाची जागा नाकारून आपले उर्वरीत आयुष्य दापोली येथील शिक्षणसंस्था नावारुपास आणण्यात खर्च केले. दापोलीनंतर सार्वजनिक जीवनास उत्कृष्ट वळण लावले. त्या तालुक्याची ही मोठीच सेवा केली. लहान क्षेत्रातील या चारित्र्यसंपन्न व्यक्तींचा या पुस्तकाच्या अखेरच्या भागात घडणाऱ्या परिचयाने 'सुबोधगीता' अधिकच परिणामकारक होते.

**— वि. ग. कानिटकर**

**सुबोधगीता :**
**लेखक – कै. शामराव विनायक देशपांडे.**
**प्रकाशक : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,**
**मूल्य : रुपये तीन.**

**पारंब्या :**
**प्रा. चंद्रकांत वर्तक**
**ज्योती प्रकाशन**
**मूल्य : रुपये चार**

**'फुलपंखी दिवस' : चंद्रकांत वर्तक–मेनका प्रकाशन : किंमत रुपये चार.**


ज्वलंत राष्ट्रवादाच्या भयानक दीप्तीचा ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

**रा. म. शास्त्री**

**मूल्य पंचवीस रुपये**

**'माणूस' मधून प्रसिद्ध झालेल्या प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.**

**राजहंस प्रकाशन**

**४१९ नारायण पेठ, पुणे २**

जुनी पुराणे : नव्या कहाण्या

# रामाचा सेतू केव्हा पुरा झाला ?

शिष्टाई अयशस्वी झाली. रावण कोणत्याही प्रकारे आपला दुराग्रह सोडायला तयार नाही हे पाहिल्यावर लंकेवर हल्ला करण्याचा निश्चय रामचंद्रांनी बोलून दाखवला. त्याबरोबर 'चलो लंका' म्हणून एकच गर्जना वानरांनी केली. काही आगाऊ वानरे तर समुद्राच्या दिशेने फर्लांगभर पळत गेलीसुद्धा. हनुमंताने त्यांच्या शेपट्या ओढून परत आणले.

"मूर्खांनो, एवढा मोठा समुद्र मध्ये पसरलेला आहे, तो दिसत नाही का तुम्हाला? चालले लगेच 'चलो लंका' करून,–" हनुमंत खेकसला.

"खरं आहे." राम म्हणाले "हा समुद्र मध्ये आहे. त्यावर पूल बांधूनच आपल्याला पुढे जावं लागेल. त्याशिवाय इलाज नाही."

"स्थापत्यशास्त्राचं ज्ञान तुम्हापैकी कुणाला आहे काय? लक्ष्मणाने पुढे सरसावून विचारले.

हा प्रश्न विचारल्यावर सर्व वानरमंडळी एकमेकांकडे टकामका पाहू लागली. 'स्थापत्यशास्त्र' असला जडजंबाळ त्यांनी कधी ऐकलेलाच नव्हता. शेवटी' 'एंजीनिअरिंग' असा खुलासा, हनुमंताने केल्यावर सर्वांना एकदम मोकळे मोकळे वाटले. मग एका वृद्ध वानराने माहिती पुरवली की नळ, नीळ जांबुवंत इत्यादी जुनी माणसे या विषयातील तज्ज्ञ आहेत. पूर्वीच्या काळचे डिप्लोमाहोल्डर असल्यामुळे सध्याच्या बी. ई. एम्. ई. ला देखील ऐकायचे नाहीत. तेव्हा त्यांच्याकडेच हे काम सोपवण्यात यावे.

ही वार्ता ऐकून रामचंद्राला समाधान वाटले. राम म्हणाले, "ठीक आहे तर. मग आजपासूनच सेतू बांधायच्या कामाला लागा. लवकरात लवकर हा पूल तयार झाला पाहिजे. आपल्या सगळ्या पुढच्या योजना त्यावर अवलंबून आहेत."

हे ऐकल्यावर पुन्हा एकदा 'पूल तावडतोब झालाच पाहिजे' अशी वानरांनी घोषणा केली. हनुमंताने डोळे वटारून सर्वांना गप्प बसवले.

ओव्हरसिअर नळ उभे राहून म्हणाले,

"रामा, आपण म्हणता ते सर्व खरं. हा पूल आम्ही लवकरात लवकर बांधण्याचं आश्वासन देतो. पण तुम्ही फार घाई करू नका, कुठल्याही कामाला आवश्यक तेवढा वेळ दिलाच पाहिजे ! नाहीतर किष्किंधा नगरीत मागं घडलेल्या गोष्टीची पुनरावृत्ती होईल—"

"असं ? मागं काय घडलं ?" लक्ष्मणाने पृच्छा केली.

नळ महाशयांनी मग सविस्तर खुलासा केला. किष्किंधा नगरीच्या वरच्या बाजूला वानरशेन या ठिकाणी एक मोठे धरण बांधण्याची योजना वालीमहाराजांनी आखली. या धरणामुळे शेतीला खूप मोठा फायदा होऊन किष्किंधा नगरीच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्नही सुटला होता. पुढच्या निवडणुकी येण्याच्या आत हे धरण बांधावे म्हणून वालीमहाराजांनी भलतीच घाई केली. सगळ्या एंजीनिअरांच्या मागे लकडा लावला—'लवकर आटपा'. म्हणून त्याचा असा परिणाम झाला की, पावसाळ्याच्या दिवसात धरण पाण्याने पूर्ण भरून अचानक फुटले आणि सबंध किष्किंधा नगरीत जलप्रलय झाला. निम्मी नगरी वाहून गेली. शेकडो, नव्हे हजारो वानरे निराश्रित झाली. त्यांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापि सुरूच आहे. त्या कामाबाबत मात्र भरपूर दिरंगाई चालू आहे......

ही माहिती ऐकल्यावर राम म्हणाले,

"ठीक आहे. टेक युअर ओन् टाईम. फार घाई करू नका. मात्र उशीरही लावू नका."

रामाची ही आज्ञा मिळाल्यावर त्याच दिवशी सेतू बांधण्याचा आराखडा तयार करण्यात आला. शेकडो भूर्जपत्रे काळी तांबडी करण्यात आली. दगडाच्या खाणीतून दगड मागवण्यात आले. आलेले दगड घडवण्याचे काम सुरू झाले. नळ, नीळ इ. एंजीनिअरांचे 'साईट' पाहण्यासाठी जीपमधून दौरे सुरू झाले. 'इंग्लिश मेथड' प्रमाणे समुद्रावर त्यातल्या त्यात कोठे सेतू बांधणे युक्त होईल यावर चर्चा झाली. शेवटी एकदाची जागा ठरली आणि एका उथळ जागेची निवड झाली. तेथे दगड टाकून पुलाचे कच्चे काम सुरू करण्यात आले. शेकडो दगड भराभर समुद्रात पडू लागले.

—पण काय आश्चर्य ! जितके दगड समुद्रात जात तितके सगळे गडपच होत. त्यांच्या ढिगाऱ्याचा थर पाण्याच्या वर काही येताना दिसेना. कित्येक दिवस काम

चालूनही शेवटी समुद्र आपला आहे तसाच ! हे काय गौडबंगाल आहे, हे काही कोणाला कळेना.

पुन्हा एकदा वरिष्ठ नेत्यांची सभा भरली. विचारविनिमय सुरू झाला.

रामचंद्र चिंतातुर होऊन म्हणाले,

" खरोखर मोठं गूढ आहे. आपण कोटचवधी रुपये आतापर्यंत खर्च केले. किष्किंधेचा कोठा सगळा रिकामा झाला. हजारो दगड पाण्यात रोज पडताहेत. अजून पाण्याच्या वर काही दगडाचा थर दिसत नाही. ही काही रावणाचीच कपटगिरी नव्हे ना ?"

एंजीनिअर नळ म्हणाले,

" रामा, आता तुम्हाला खरं सांगतो. या आमच्या सरकारी खात्यातल्या लोकांना वाईट सवयी लागल्या आहेत. मागं एकदा तर पूल अजिबात न बांधताच, पूल बांधला म्हणून कळवून, त्याचं कंप्लीशन सर्टिफिकेट देऊन, त्याच्या दुरुस्त्या वरचेवर केल्याचं दाखवून पैसे खाऊन मोकळे. इथं तर काय, प्रत्यक्ष पूल बांधायचं काम चालू आहे ! कुणाचा कुणाला पत्ता नाही. किती दगड आणले अन् किती टाकले. किती कामावर हजर असतात अन् किती नुसती हजेरी लावून बिडचा ओढीत हिंडतात. नुसता कागदोपत्री मेळ आहे. सगळे दाबून पैसे खायला सोकले आहेत !"

" मग आता ?"

" आता काय ? अशा पद्धतीनं पूल बांधायचं काम कल्पांतापर्यंत पूर्ण होणार नाही. अन् बांधून झालाच तर सीतादेवी तोपर्यंत म्हाताऱ्या झालेल्या असतील. मग त्यांना सोडवून आणून तरी उपयोग काय ?"

" कदाचित रावणसुद्धा तोपर्यंत आपोआप मरून जाईल–निदान रिटायर तरी होईल हे नक्की !" नीळ म्हणाला.

" अगदी करेक्ट !" जांबुवंत म्हातारबुवा मान हलवून उद्वेगाने म्हणाले, " साले, सगळे पैशाला हपापलेले. वरच्या अधिकाऱ्यापासून मुकदमापर्यंत एक नमुना. कामगार माकडं तर बोलायलाच नको. दहा दगड टाकतात अन् शंभर टाकल्याचा हिशेब लावताहेत. दर शेकडचाला सगळ्यांची भागी आहे. कमिशनवर कामं चालू आहेत सगळी."

हे ऐकल्यावर लक्ष्मण तापलाच. हातातल्या धनुष्याचा त्याने एकदम टणत्कार केला. " थांबा ! एका क्षणात या हरामखोरांना यमसदनाला पाठवतो. ही लुच्चेगिरी काय !"–तो तावातावाने ओरडला.

रामांनी मोठ्या प्रयासाने लक्ष्मणाला शांत केले. " अरे बाबा, हे चालायचंच. लोक हे असेच असतात. तरी बरं हे वानर आहेत. निदान यांचे वरचे नेते तरी प्रामाणिक आहेत. हेच नर असते तर मग सगळाच आनंद. वरच्या मंत्र्यांपासून खालपर्यंत भ्रष्टाचारच दिसला असता–" ते शांतपणाने म्हणाले.

" ते खरं. पण आपल्या कामाचं काय ? ते व्हायला नको का ?" लक्ष्मण कसा-बसा राग आवरून बोलला.

रामचंद्रांनी आता हनुमंताकडे प्रश्नार्थक दृष्टिक्षेप केला. त्यातील गर्भित अर्थ जाणून हनुमंत पुढे झाला. तो म्हणाला, " आपण काही एक काळजी करू नये. मी वानरसैन्याचा सेनापती आहे. मी मिलिटरी खाक्याचा प्राणी आहे. माझ्या हातात सगळी सूत्रं द्या. हे सिव्हिलचं कामच नाही. इथं मिलिटरीच पाहिजे. म्हणजे दाखवतो हिसका एकेकाला. जरा कुठं कामचुकारपणा दिसला किंवा लबाडी आढळली तर शेपट्याच तोडतो एकेकाच्या. बघाच तुम्ही–"

दुसऱ्या दिवसापासून पूलउभारणीची सगळी सूत्रे सैन्याकडे आली. सेनापती हनुमंत स्वतः तंबू ठोकून रात्रंदिवस साईटवर उभे राहिले. दगडांची अफरातफर, गोंधळ होऊ नये म्हणून प्रत्येक दगडावर नंबर टाकण्यात आले. योग्य तोच माल वापरला जावा, यासाठी ' राम आणि कंपनी ' असा शिक्काही प्रत्येक दगडावर मारण्यात आला. कामचुकारांना भराभर फटक्याच्या शिक्षा मिळू लागल्या. लोकही उत्स्फूर्तपणे श्रमदान करू लागले. (कुमारी खारूताई नावाच्या एका नाजूक समाज-सेविकेने थोडीशी वाळू पाण्यात टाकून या उपक्रमात सक्रिय भाग घेतला तेव्हा रामांनीही तिची पाठ थोपटली. असो.)

मग मात्र पूल बांधणीचे काम झपाट्याने पूर्ण झाले. आठ दिवसात सेतू पाण्यावर दिसू लागला. समुद्राच्या पाण्यावर दगडांची रास आली आणि प्रत्येक दगडावरचा शिक्काही स्वच्छ दिसू लागला–' राम आणि कंपनी '

—द. मा. पुराणिक

उत्कृष्ट इन्-डोअर व औट-डोअर फोटोग्राफीसाठी संपर्क साधा

**साधना फोटो स्टुडिओ**

सोन्या मारुती चौक, लक्ष्मी रोड, पुणे २

फोन : २६४०१

# सुदर्शन

सिनेमातील मंडळी नाटकात गेल्याचे उदाहरण 'मद्रासेत' सरसकट पाहावयास मिळते. राजकारणाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या मंडळींनी सिनेक्षेत्रात प्रवेश केल्याचे उदाहरण "सुदर्शन" चित्रपटाच्या निमित्ताने पाहावयास मिळाले.

आमदार रत्नाप्पा कुंभार व सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांनी हा चित्रपट निर्माण केला आहे. खासदार व दैनिक केसरीचे संपादक श्री. जयंतराव टिळक यांच्या अध्यक्षतेखाली या चित्रपटाचा उद्‌घाटन समारंभ पुण्यात साजरा झाला.

**कथानक**

जीवन नावाच्या ध्येयवादी तरुण पत्रकाराची कथा या चित्रपटात सांगण्यात आली आहे. समाजवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा, गोरगरीबांबद्दल सहानुभूती असलेला जीवन दैनिक संपत्तीचा संपादक असतो. लेखन स्वातंत्र्यावर मर्यादा आल्याने जीवन संपादकत्वाचा राजिनामा देतो आणि अन्य प्रलोभनाला बळी न पडता सुदर्शन नावाचे साप्ताहिक सुरू करतो. साप्ताहिकाला यश मिळून त्याचे दैनिकात रूपांतर होते. तथापि मध्यंतरीच्या काळात दैनिक संपत्तीचे नवीन संपादक पारिजात व मॅनेजिंग डायरेक्टर वैकुंठशेठ जीवनच्या विरुद्ध कारस्थान रचतात. ते यशस्वी होत नाही आणि सुदर्शन दैनिक व जीवन हे दोघेही या संकटातून बाहेर पडतात. वैकुंठ शेठजींची मुलगी मधुराणी जीवनवर प्रेम करीत असते. तिच्या मार्गातील अडचणी दूर होऊन जीवन मातोश्रींच्या आशिर्वादाने जीवन-मधूचे मीलन होते. पारिजातचे खरे स्वरूप उघड झाल्यावर वकुंठशेठ संतापाच्या भरात त्याला ठार मारतात. तर जिच्यामुळे जीवनला दैनिक संपत्ती सोडावी लागते आणि जिच्या आर्थिक सहाय्यावर सुदर्शनची प्रगती होते ती वंदना नृत्यकलेला वाहून घेते.

प्रामाणिक हेतू बाळगून चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असल्याने आणि सर्वसाधारण निर्मितीमूल्ये मराठी चित्रपटाच्या मानाने समाधानकारक असल्याने अलीकडे प्रदर्शित झालेल्या मराठी चित्रपटांच्या मानाने चित्रपट पुष्कळच उजवा वाटतो.

निर्माते स्वतः वृत्तपत्रव्यवसायात वावरत असल्याने आणि कथा पटकथा संवाद त्यांचेच असल्याने जीवनच्या तोंडून त्यांनी आदर्श वृत्तपत्राच्या स्वतःच्या कल्पना

सांगितल्या आहेत. जीवनचे व्यवसायीन जीवन दाखवण्याच्याच उद्देशाने निर्मिती झाली असती तर चित्रपट एकांगी झाला असता परंतू वंदनाच्या उपकथानकाची जोड देऊन आणि वंदना नृत्यांगना असल्याचे दाखवून चित्रपटाची रंजकता वाढवली आहे.

नायकाच्या विरोधकाची मुलगी आणि नायक यांचे प्रेम असणे, आणि मुलीच्या वडलांकडून प्रारंभी असणारा विरोध ऐन वेळी मावळणे, केलेल्या दुष्कृत्यांचा अगदी शेवटच्या क्षणी (चित्रपट संपता संपता) पश्चात्ताप वाटणे, आदि घटना या पूर्वी अनेक वेळा आल्या आहेत. त्या येथेही पहावयास मिळाल्या, आणि पुढेही पहावयास मिळतील.

हाती असलेल्या कथानकाला न्याय देण्याचा प्रयत्न दिग्दर्शक दत्ता माने यांनी केला आहे. तथापि कथेतील काही न पटणाऱ्या घटना तशाच राहून गेल्या आहेत. उदाहरणार्थ वैकुंठशेठ सारखा अत्यंत व्यवहारी माणूस संपादक म्हणून विकत घेतलेल्या पारिजातला आपली मुलगी देण्यास तयार होतो हे पटू शकत नाही. जीवनवर घातलेले मारेकरी त्याला घरी का नेतात, कारण त्याला ठार मारणे एवढाच त्यांचा उद्देश असतो. आणि उद्देशपूर्तीसाठी घरी नेण्याची आवश्यकता नसते.

जमेच्या बाजूलाही दत्ता माने यांची कामगिरी समाधानकारक आहे. सुदर्शनच्या स्थापनेपासून ते त्याच्या भरभराटीपर्यंतचा काळ 'मॉंटाज' द्वारे यशस्वीपणे दाखवण्यात आला आहे. तथापी याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे जीवन व वंदना, आणि जीवन व मधुराणी यांच्यातील प्रसंग जीवनच्या उदात्त व्यक्तिमत्त्वाला धक्का लागणार नाही अशा पद्धतीने हाताळले आहेत.

विकासयोजनांवर आधारलेले गीत अगदीच प्रचारकी थाटाचे असले, तरी त्याचे "बाळबोध" चित्रीकरण समाधानकारक वाटते.

कलाकारांमध्ये जीवनची भूमिका करणाऱ्या सुधीरकुमारचा उल्लेख आगत्याचा वाटतो. आपली भूमिका त्याने जबाबदारीने पार पाडली आहे. तथापि संवाद बोलण्याची एकच ढब सातत्याने वापरल्याने काही वेळा ही पद्धत कंटाळवाणी वाटते.

जीवनकला, उमा, रत्नमाला, राजा पंडित आणि दादा साळवी, आपल्या भूमिका समजून करतात. बी. माजनाळकरांनी मुरारीच्या छोट्या भूमिकेत रंगत आणली आहे.

तांत्रिक बाजू बेताच्याच आहेत. सेटस् मध्ये कृत्रिमता भरपूर आहे. छाया चित्रीकरण ठाकठीक आहे. संगीताबाबत राम कदम यांनी निराशा केली आहे.

तथापि प्रामाणिक हेतूने तयार करण्यात आलेला हा चित्रपट प्रेक्षकांनी आवश्य पहावा असे सुचवावेसे वाटते.

**शरद गोखले**

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## ऑक्टोबर ५ ते ११ राशी-भविष्य

**मेष :** मध्यंतरी अशा काही घटना घडल्या की, त्यामुळे तुमची जिद्द डिवचली गेली. पुन्हा शनी १२ वा आला त्याचा हा प्रताप. पण निर्धार निष्ठेचे व्रत अखंडपणे आचरणाऱ्यांना अनिष्ट कालावर निश्चितपणे मात करता येते—आणि गेल्या काही कालात तुम्ही प्रत्यक्ष आपल्या कृतीने जगाला दाखवले.

तरी सुद्धा वक्री शनी असेपर्यंत आपणास फार विचारानेच पावले टाकायला हवीत. पैशा आडक्याच्या बाबतीत तर आपणाला सारे व्यवहार डोळ्यात तेल घालून करायला हवेत.

या कालात विरोधक उठाव घेतील, वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. ठरलेले वेळापत्रक सारखे चुकू लागेल.

दि. ८ ते १० या कालात प्रयत्न यशस्वी ठरावेत.

**वृषभ :** चौथ्या मंगळाचा भर ओसरल्याशिवाय आपल्या बाबतीत काही विशेष घडेल ही आशा खोटी. आपला निर्धार मात्र आपण डळमळू देऊ नका.

एकच एक समाधान की, या आठवड्यात बुध-शुक्र आपणास अनुकूल आहेत. अगदी ऐनवेळी त्यांच्या मदतीचा हात पुढे होईल, आपली डळमळणारी बाजू सावरली जाईल.

वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करा.. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी आपल्या सदसद्विवेक बुद्धीला आवाहन करा.

आपणास या वेळी तरी आपले व्यवसायाचे जुने तंत्र बदलल्याशिवाय गत्यंतरच नाही.

नव्या व्यवसायाचे विचार डोक्यात सध्या मुळीच आणू नका.

दि. ५–६–१०–११ थोडेफार यश या वेळी लाभावे.

**मिथुन :** पराक्रमस्थ गुरु-मंगळांचे हार्दिक सहकार्य जोपर्यंत आपणास मिळत आहे तोपर्यंत शनि राहूसारखे ग्रह तुमच्या मार्गात अडथळे आणण्याचे साहस पत्करणार नाहीत.

पण हे दिवस खूपच धावपळीचे घाईगर्दीचे जाणवायला लागतील. क्षणाची उसंत मिळणार नाही. पंचमात बुध-शुक्र असल्यामुळे अनपेक्षित लाभाला हे दिवस अधिक अनुकूल जाणवतील.

साहित्य, वृत्तपत्रीय लेखन, ग्रंथप्रकाशन या बाबतीत आपल्या हातून अनन्य-साधारण कार्य घडावे.

संशोधनक्षेत्रात सामाजिक विषयात तुमचे महत्त्व विशेषत्वाने जाणवेल. नोकरीत बदल, स्थानांतरही घडावे.

दि. ८–९–१० या काळी महत्त्वाच्या घटना घडून याव्यात.

**कर्क** : धनस्थानी मंगळ ही ग्रहस्थिती फारशी अनुकूल नसली तरी पराक्रमातील सूर्य हर्शल तुम्हाला कशाचीही उणीव भासू देणार नाही. कशाही अवघड प्रसंगी तुम्हाला सहाय्य करायला ते कटिबद्ध आहेत.

या आठवड्यात–आगामी महिन्याभरातही आपल्या जीवनात फार मोठे बदल घडून यावेत. सुरवातीला त्यांच्यापासून फारशी लाभाची आशा करता आली नाही तरी–भविष्यकाल आपलाच आहे अशी तुमची खात्री पटवतील.

आपले व्यावसायिक क्षेत्र बदलेल, दूरच्या ठिकाणी बदली घडून येण्याची लक्षणे दिसू लागतील. क्षणाची उसंत मिळणार नाही. अनंत कामांचे डोंगर उपसावे लागतील.

दि. ९ ते ११ या काली अल्पशा यशाची आशा करायला जागा आहे.

**सिंह** : शनी-राहू अष्टमातून जात आहेत. ते विरोधाचे, अस्वास्थ्याचे वादळ उठवतील. नको त्या अडीअडचणी समोर उभ्या राहतील. असे आहे म्हणून निराश होण्याचे मुळीच कारण नाही, गुरू धनस्थानी येत आहे तो आपल्या साऱ्या व्यथा-विवचना मिटविण्यास सदैव झटत राहील.

सांपत्तिक ताण क्षणभर बसेल, विरोधक उठाव घेत असल्याची जाणीव होत राहील.

यांत्रिक व्यवसाय-धंद्याशी आपला संबंध असेल तर या वेळी आपण फारच जपून वागायला हवे. अनपेक्षितपणे आघात होऊ लागतील. अगदी भरवशाची माणसेही कोणत्याही क्षणी दगा देतील.

दि. ८ ते १० या कालात अनेक कार्यक्रमात भाग घ्यावा लागेल.

**कन्या** : बाराव्या मंगळाने सध्या आपणास अगदी धारेवर धरले आहे. आरोग्य पैसा, प्रतिष्ठा या सर्वांवर अनिष्टतेचे सावट पसरत असल्याची जाणीव होऊ लागेल.

पण ही अनिष्टता दीर्घ काल अशीच राहील अशी भिती मुळीच बाळगू नका. गुरूचे आपल्या राशीत आगमन घडताच–आशादायक वातावरण दिसू लागेल.

सप्तमातील वक्री शनीमुळे, कौटुंबिक वातावरण बरेच बिघडण्याचा संभव आहे. भागीदारीचे व्यवहार अंगलट येण्याची शक्यता आहे. नितांत सावधगिरीची याच-वेळी गरज भासू लागेल.

अनेकांचे सहाय्य घेतल्याशिवाय कोणतेही काम अंगावर घेण्याच्या फंदात पडू नका.

दि. ९ ते ११ या कालात थोरांचे सहाय्य लाभावे.

**तूळ :** आपल्या राशीच्या व्ययस्थानी अनेक उग्र ग्रहांचे आगमन घडत आहे. त्यांचा थोडाफार तरी परिणाम आपल्या जीवनावर, व्यवसायधंद्यावर झाल्या-शिवाय कसा राहील ?

अगदी याच आठवड्यात आपणास संभाव्य अडचणींना तोंड द्यावे लागेल असे नव्हे पण भविष्यकालीन अनिष्टतेची आपणास जाणीव व्हावी म्हणून मला असा स्पष्टपणे इषारा द्यावासा वाटतो.

गुरू व्ययस्थानी येणार असल्यामुळे त्याच्या भरवशावर आपणास आता अवलं-बून राहता येणार नाही. या काली इष्टमित्र नोकरचाकर यावरही फारसे अव-लंबून राहू नका.

नोकरीधंद्यातील वातावरणही गढूळ बनण्याचा संभव दिसतोय.

दि. ७ ते ९ थोडाफार अनुकूल काल.

**वृश्चिक :** रवि–हर्शल बरोबरच गुरूही आपल्या लाभस्थानी येणार आहे. कित्येक वर्षांत आलेली नसेल इतकी सर्वोत्तम अनुकूल ग्रहस्थिती आता आपल्या वाटयास येणार आहे. आपल्या साऱ्या भव्य योजना आता गती घेऊ लागतील. नोकरीधंद्यांत अनेक पावले पुढे जाण्याची संधी लाभेल.

यांत्रिक, वैद्यकीय क्षेत्रात तर तुम्हाला फारच मोठी क्रांती घडवून आणता येईल. कला–क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना हा एक महान पर्वकाल लाभल्यासारखे वाटू लागेल. बढती कोणत्याही क्षणी होऊ शकेल, सामाजिक क्षेत्रातील फार मोठे जबाब-दारीचे स्थान आपणास सहजासहजी लाभू शकेल.

दि. ९ ते ११ या काली आपल्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल व्हाव्यात.

**धनू :** पुन्हा एकदा आपणास अनिष्ट कालाशी झगडावे लागेलसे दिसते. आता-पासूनच सावध राहता यावे म्हणून आपणास असे स्पष्टपणे सुचवून ठेवावे लागत आहे.

नोकरीत नको त्या ठिकाणी स्थानांतर घडेल, राहत्या जागेसंबंधी पेचप्रसंग वाढू लागतील, विरोधक कोणत्याही क्षणी कारस्थाने लढवू लागतील. आरोग्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही.

एकच एक समाधान की, मंगळ आपल्या भाग्यस्थानी आहे – तो याही पेच-प्रसंगामधून तुमची मुक्तता करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करील. या वेळी कोणा-वरही विसंबून राहणे धोक्याचे ठरेल.

८ ते १० थोडाफार अनुकूल काल.

**मकर** : भाग्यात गुरू येत आहे – गुरूची ही अवस्था म्हणजे निसर्गाकडून आप-णास लाभलेले वरदानच. अशी अवस्था आज १२ वर्षांनंतर घडत आहे. शिवाय रवि–हर्शलांसारखे अनेक समर्थ ग्रहही भाग्यस्थानातून संचारू लागले आहेत.

अशी सर्वोत्तम ग्रहस्थिती पाहिल्यानंतर आपल्या बाबतीत मला असे म्हणावेसे वाटते की, तुमचा परमोत्कर्षाचा काल हाच.

या वेळी जे जे कराल ते ते घवघवीत यश घेऊन उठेल, नव्या योजना आकार घेऊ लागतील, धनिकांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभू शकेल, उद्योगधंद्याचे नवे तंत्र अपेक्षेबाहेर यशस्वी ठरेल.

९ ते ११ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कुंभ** : मंगळाच्या डोकेदुखीमुळे आपणास काही सुचेनासे होईल. काही दिवस सहन केल्यावाचून गत्यंतर नाही.

कौटुंबिक व व्यावसायिक वातावरण प्रसन्न राहीलसे दिसत नाही. या वेळी माघार घेण्यावाचून अन्य उपायच नाही.

बुध–शुक्रांची कृपा लाभल्यामुळे थोडीफार मंगळाची अनिष्टता कमी होईलही– तरीसुद्धा या काली प्रत्येक गोष्ट विचाराने करा.

उद्योगधंद्यात अडचणी वाटू लागतील. नोकरीत वरिष्ठांची नाराजी पत्करावी लागेल, सामाजिक–राजकीय क्षेत्रांत तर पदोपदी विरोध पत्करावा लागेल. नम्रता, लीनता याशिवाय या कालावर अन्य प्रभावी उपाय नाही.

७ ते ९ थोडाफार अनुकूल काल.

**मीन** : सध्या थोडेफार अनुकूल वातावरण दिसत असले तरी ते भरवशाचे नव्हे. शनी वक्री असेपर्यंत (डिसेंबर पहिल्या आठवड्यापर्यंत) आपण आपल्या भवि-तव्याबाबत थोडेफार साशंकच राहाल.

प्रकृती, मनस्थिती ठीक राहीलसे दिसत नाही. व्यवसायधंद्यात परिश्रमाच्या मानाने फारसा लाभ पदरी पडेल असे दिसत नाही.

नोकरीधंद्यांत बदल करणे, फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलणे इष्ट ठरणार नाही. आणि राजकीय क्षेत्रात भाग घेणे परिणामी हितावह होणार नाही.

गुरू सप्तमात येणार आहे तोच तेवढा आपल्याशी काही एकनिष्ठ राहील, अन्य ग्रहांबद्दल आशा करायला जागा नाही.

दि. ८ ते १० थोडेफार अनुकूल दिवस. ○

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. **माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. MH-649

## सिंधू मराठे

एक अकाली प्रौढ पण वयाने कोवळी, ब्राह्मण घरची मुलगी. नजरेत न भरणारे रूप. हाती चाळांची जड पिशवी. दुसरा हात जन्मदात्या हाती. बरोबर वयाने जराशीच मोठी बहीण. चित्रपट-निर्मात्यांच्या दारी काम हवे म्हणून जायचे, ते न मिळाले की आनंदित होऊन परतायचे, हा दिनक्रम....



हिच्या दारी पुढे चित्रपट-निर्माते पैशांच्या थैल्या घेऊन येऊ लागले तेव्हा ही होती यौवनसंपन्न, अभिनयनिपुण चित्रतारका

## उषाकिरण

वैभवाच्या शिखरावर पोचलेली.

**एका विलक्षण आयुष्याचा मनोज्ञ आलेख**

**'माणूस' दिवाळी अंक**